cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com   नवी दिशा... नवे विचार.....   email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१८८ | बुधवार, दि.३० ऑक्टोबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# साखरेच्या दरातील घसरणीने कारखानदारांची कोंडी ?

**पुणे । प्रतिनिधी**

**दिवाळीच्या पार्श्वभूमिवर घाऊक बाजारात साखरेच्या दरात घसरण झाली आहे. प्रतिक्विंटल ३ हजार ६५० रूपये असणारा दर अचानक ३ हजार ४५० रूपयांपर्यंत आला आहे. याचबरोबर नोव्हेंबर–२०२४ चा विक्री कोटाही कमी झाला आहे. ऑक्टोबर महिन्याचा साखरेचा विक्री कोटा २५ लाख टन होता तो नोव्हेंबर महिन्यात २२ लाख टनांवर आला आहे. ३ लाख टनांचा विक्री कोटा कमी करण्यात आला आहे.**



## साखरेचा विक्री कोटा झाला कमी

यंदा साखरेला मागणी चांगली राहिल्याने दरही चांगला मिळत होता. सप्टेंबरपर्यंत सरासरी ३ हजार ६५० रुपये प्रतिक्विंटलपर्यंत साखरेचा दर होता. मात्र, सध्या ३ हजार ४५० रुपयांपर्यंत खाली आला आहे. शासनाने ऑक्टोबरमध्ये २५ लाख टन साखर विक्रीचा कोटा साखर कारखान्यांना दिला होता. मात्र, त्यातील २० टक्के साखर अजूनही कारखान्यांकडे शिल्लक आहे. तोपर्यंत, नोव्हेंबरचा कोटा जाहीर करण्यात आला आहे. सध्या घाऊक बाजारात ३ हजार ४५० रुपये प्रतिक्विंटलचा दर आहे. मागील तीन महिन्यांतील साखरेच्या दराची सरासरी काढून त्यातील ८५ टक्के रक्कम बँका कारखान्यांना ऊस बिलापोटी देतात. तीन महिन्यांचा सरासरी ◀◀ पान २ वर

### साखरेचा साठा पडून

साखर उपलब्ध आहे पण डिमांड नाही सध्या अशी परिस्थिती आहे. दसरा, दिवाळीला जी अपेक्षित साखर उचल व्हायला हवी होती ती झाली नसल्याने दर कमी होत आहेत. साखर कारखान्याकडे साखरेचा साठा शिल्लक आहे, त्यामुळे उर्वरित साखर खपवायची कशी असा प्रश्न कारखानदारांपुढे पडला आहे.

# बीडची जागा मुंडे बहीण–भावाने खेचून आणली

## डॉ.योगेश क्षीरसागर यांना आमदार होण्याची संधी



**बीड । प्रतिनिधी**

**महायुतीतील बीडच्या जागेचा तिढा अखेरच्या क्षणापर्यंत सुटत नव्हता. जागावाटपात शिवसेनेच्या वाट्याला गेलेली बीडची जागा मुंडे बहीण–भावाने प्रतिष्ठापणाला लावून परत खेचून आणली. मंगळवारी (दि.२९) मध्यरात्री १ वाजता हा तिढा सुटला आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांना बीड विधानसभेचा सदस्य अर्थात आमदार होण्याची संधीच प्राप्त झाली आहे.**

महायुतीचे अधिकृत उमेदवार ठरलेल्या डॉ.योगेश क्षीरसागर यांनी महायुतीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करताना भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, शहराध्यक्ष जगदीश गुरखुदे, रिपाइं कवाडे गटाचे जिल्हाध्यक्ष अनिल तुरुकमारे, अजय सवई, डॉ.लक्ष्मण जाधव, ॲड.प्रज्ञाताई खोसरे, राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष सचिन जाधव, इरफान बागवान, अनिल चांदणे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा, ◀◀ पान २ वर

# मराठा, दलित, मुस्लिम समीकरण जुळविणार

## मनोज जरांगे यांचे स्पष्टीकरण, आज देणार याबाबतची माहिती

**जालना । प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणूक लढण्यासाठी पंधरा–वीस दिवसांपासून मराठा, मुस्लिम, दलित समीकरण जुळवणे सुरू आहे. यासंदर्भात अधिकृत माहिती ३० ऑक्टोबर रोजी बैठकीत सांगणार असल्याचे मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी अंतरवाली सराटी येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले.**

समीकरण जुळणे अत्यंत आवश्यक आहे. एका जातीवर निवडणूक लढवली जात नाही. उमेदवारांनी अंतरवालीत गर्दी करू नये.



### फडणवीस म्हणजे उपसरपंच

यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांना उपसरपंच असे संबोधत त्यांच्यावर टीका केली. मोठे साहेब तिकडे बसले आहेत. त्यांच्याच हातात सर्वकाही आहे, पण यावेळी त्यांचा कार्यक्रम शेतकरी करतील, असेही जरांगे म्हणाले.

मराठा, मुस्लिम, दलित एकत्र यायला पाहिजे, मग राज्यात शंभर टक्के परिवर्तन होऊ शकते. समाज निर्णय प्रक्रियेत उभा राहणार आहे का? हे बघणे महत्त्वाचे आहे. ३० तारखेला दलित–मुस्लिम– मराठा यांचा काय निर्णय बाहेर निघतो हे बघणे महत्त्वाचे आहे, असे जरांगे म्हणाले. सध्या इतके भावी आमदार झाले, पण मतदारसंघ कमी आहेत. नाराज होऊन शे–दीडशे भावी आमदार नाराज होतील, मात्र मी सहा कोटी मराठा समाजाला नाराज करणार नाही. दीडशे–दोनशे लोकांसाठी सहा कोटी मराठा समाजाचे वाटोळे करणार नाही. राज्यात आम्ही कोणालाही पाठिंबा दिला नाही, असे ते म्हणाले.

# माझ्यात आणि संजय भाऊंमध्ये कधीच मनभेद नव्हते–धनंजय मुंडे

## धनंजय मुंडे माझे बंधू, त्यांची निवडणूक मी माझी समजून पूर्ण क्षमतेने प्रचार करणार–संजय भाऊ दौंड



अंबाजोगाई । प्रतिनिधी

माजी आ.संजय भाऊ दौंड यांनी महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे यांच्या पाठीशी सर्व ताकदीने उभे राहण्याचा निर्णय घेतला असुन, ते आजपासूनच धनंजय मुंडे यांच्या प्रचारात सक्रिय होणार असल्याचे आज धनंजय मुंडे व माजी आ.संजय भाऊ दौंड यांनी आज संयुक्त पत्रकार परिषदेत सांगितले आहे.

माजी आ.संजय भाऊ दौंड हे विधानसभा निवडणुकीत इच्छुक असून, ते धनंजय मुंडे यांच्या विरोधात निवडणूक लढवतील का, या चर्चेला आता पूर्णविराम लागला ◀◀ पान २ वर

# माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

**बीड । पतिनिधी**

**मी सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन चालणारा माणूस आहे. या शहराचा नाही तर जिल्ह्याचा व मराठवाड्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी मी प्रयत्नशिल असेल. सत्ता हे माझं अंतिम साध्य नाही तर साधन आहे. मुलभूत सुविधा पुरविणे हे माझे प्राधान्य आहे असे प्रतिपादन माजी मंत्री तथा बीड विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार** ◀◀ पान २ वर



# आता सुट्ट–सुट्टच खेळू–होऊन जाऊद्या–मा.आ.भीमराव धोंडे



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेले आणि मतदारसंघाच्या माजी आ. भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीत कार्यकर्त्यांनी या निवडणुकीत सर्व ताकदीनिशी उतरण्याचा निर्धार केला असून कसल्याही परिस्थितीत विजयश्री खेचून आणायचाच असा निर्धार केला तर, ◀◀ पान २ वर

# अखेरच्या दिवसापर्यंत जिल्ह्यात ५६६ अर्ज दाखल

**बीड । पतिनिधी**

**बीड जिल्ह्यामध्ये सहा विधानसभा मतदारसंघात एकूण ४०९ उमेदवारांनी ५६६ अर्ज दाखल केले. यामध्ये दिनांक २९ ऑक्टोबर रोजी अखेरच्या दिवशी १७६ उमेदवारांनी २६६ अर्ज दाखल केले.**

बीड जिल्ह्यातील सहाही मतदारसंघांमध्ये उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी १७६ उमेदवारांनी २६६ अर्ज दाखल केले .यामध्ये गेवराई मतदार संघातून २१ उमेदवारांनी ३५ अर्ज, माजलगाव मतदार संघातून ४१ उमेदवारांनी ६५ अर्ज, बीड मतदार संघातून ५१ उमेदवारांनी ७९ अर्ज, आष्टी मतदार संघातून १३ उमेदवारांनी १९ अर्ज, केज मतदार ◀◀ पान २ वर




माजलगाव: आ.प्रकाश सोळंके यांनी लाडक्या बहिणींना सोबत घेत उमेदवारी अर्ज दाखल केला.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२९ ऑक्टोबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३.५० क्विंटल | २,६५१ | २,९५१ | २,८४७ |
| ज्वारी/हायब्रिड: ४९.५० क्विंटल | १,८९० | ३,२३० | २,३८७ |
| मका/लोकल:२५.०० क्विंटल | २,३३७ | २,३३७ | २,३३७ |
| तूर :७.५० क्विंटल | ८,६०० | ८,६०० | ८,६०० |
| उडीद : ७.०० क्विंटल | ६,५०० | ७,५०० | ७,१६५ |
| बाजरी: २८.५० क्विंटल | २,५०० | ३,००० | २,७५३ |
| मुग : ०.५० क्विंटल | ६,८०१ | ६,८०१ | ६,८०१ |
| सोयाबीन: २२२.०० क्विंटल | ३,७०१ | ४,२५० | ४,०१२ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ६,००१ | ७,००० | ६,५०० |

# राजस्थानची संस्था देते बीडच्या ‘जलजीवन’ चे प्रशिक्षण

## उपस्थिती असते दोन–तीनशे मात्र दाखवली जाते हजार बाराशे, मुकाअचे चौकशीचे आश्वासन





**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये ज्यांना मराठीचा गंध नाही अशा एका राजस्थानी संस्थेला जलजीवन मिशनच्या व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणाचे काम सोपवण्यात आले असून हे प्रशिक्षण योग्य व्यक्ती घेतात की नाही याकडे जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. विशेष म्हणजे प्रत्येक ग्रामपंचायत मधून पाच लोक असे तालुक्यात किमान १२०० ते १५०० सदस्य उपस्थित असणे आवश्यक आहे. मात्र या ठिकाणी २०० ते ३०० च्या वर लोक हजर नसतात .उपस्थिती मात्र हजार–बाराशेंची दाखवली जाते. विशेष म्हणजे एका ग्रामपंचायतीच्या उपस्थित कार्यकर्त्यांच्या पाचही जणांच्या नावापुढे बोगस घेतल्या जातात. आणि त्याचे देएक उचलले जाते ही गंभीर बाब असून यासंदर्भात मराठी पत्रकार परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्याकडे तक्रार केली असता त्यांनी याबाबत लक्ष घालून याची चौकशी करतो असे आश्वासन दिले आहे.**

गेल्या काही दिवसापासून जिल्ह्यातच नव्हे तर राज्यभरात जनजीवन मिशनच्या पाणी व्यवस्थापनाचे प्रशिक्षण हे राजस्थानच्या एका संस्थेला दिलेले आहे. ज्यांना मराठी येत नाही त्यांना ग्रामीण भागातील सरपंच, ग्रामसेवक, जलसुरक्षक, अंगणवाडी ताई ,आशावर्कर यांना प्रशिक्षण देण्यासाठी या राजस्थानी संस्थेला काम देण्यात आलेले आहे. हे प्रशिक्षण ११ तालुक्यांमध्ये घेणे अपरिहार्य आहे. प्रत्येक तालुक्यात ◀◀ पान २ वर

### प्रशिक्षणाची अधिकाऱ्यांनाच कल्पना नाही

जल जीवन मिशनचे पाणी व्यवस्थापन प्रशिक्षण कुठे सुरू झाले ?कधी सुरु झाले? कधी संपणार? याची माहिती अधिकाऱ्यांना नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

### तीन हॉलमध्येच प्रशिक्षण

यावेळी तुलशी महाविद्यालयात चालू असलेल्या या प्रशिक्षणाला पत्रकारांनी भेट दिली त्यावेळी तीनच हॉलमध्ये प्रशिक्षण चालू होते एका हॉलमध्ये किमान ५० लोक म्हटले तरी दीडशे लोक होतात. मग बिल हजार बाराशे लोकांचे कसे काय निघते? याबाबत आश्चर्य व्यक्त होत आहे

### हिंदी भाषिकांना मराठी प्रशिक्षणाचे कंत्राट

महाराष्ट्रामध्ये ग्रामीण भागातील प्रत्येक ग्रामपंचायत सदस्यांना प्रशिक्षण देण्यासाठी मराठी संस्थेची निवड न करता राजस्थानच्या म्हणजे हिंदी भाषिक संस्थेची निवड करण्यात आली .ते ग्रामीण भागातील कर्मचारी आणि पदाधिकाऱ्यांना मराठीत काय प्रशिक्षण देणार असा मोठा प्रश्न आहे.

### प्रशिक्षणात काय आवश्यक असते

तालुकास्तरीय प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थींच्या बसण्याची व्यवस्था, त्यांना माहिती पुस्तिका, पेन ,डायरी, फोल्डर याबरोबरच त्यांना सकाळचा चहा, नाश्ता, दुपारचे जेवण, पुन्हा चार वाजता चहा या बाबी प्रशिक्षणामध्ये समाविष्ट आहेत. मात्र सकाळी फक्त चहा दिला जातो आणि दुपारी दोन वाजता जेवण झाल्यानंतर प्रशिक्षणाचे समाप्तीच केली जाते. त्यामुळे चार चा चहाचा प्रश्नच येत नाही. दुपारचे जेवणही निकृष्ट दर्जाचे असल्याच्या प्रशिक्षणार्थींच्या तक्रारी आहेत.

cmyk

## अग्रलेख

# महत्वाकांक्षी राजकारणात नात्यांची होरपळ !

महाराष्ट्राच्या राजकारणाला जे विचित्र वळण लागले आहे त्याचाच पुढचा अंक म्हणजे यंदाच्या निवडणुकीत बाप विरुद्ध लेक, पतीविरुद्ध पत्नी, चुलत्या विरुद्ध पुतण्या अशा रक्ताच्या नात्यांची सत्वपरीक्षा बघणाऱ्या लढती होणार आहेत. लोकसभा निवडणुकीत नणंद आणि भावजयीची बारामतीत झालेली लढत खूपच गाजली होती. त्या काळात जोशात असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांचे नाव न घेता लोकांना भावनिक केले जाईल, अश्रू ढाळले जातील तुम्ही त्या प्रकाराला भुलू नका असे भाषण केले होते. ही निवडणूक खूपच गाजली. विशेष म्हणजे अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. बारामतीचे लोक अजित पवार यांना मानत होते. मात्र तरीसुद्धा त्यांनी शरद पवार यांच्या बाजूने झुकत सुप्रिया सुळे यांना विजयी केले. हा दादांच्यासाठी एक मोठा धक्का होता. विशेष म्हणजे त्यानंतर विधानसभा निवडणूक लागताना अजितदादांनी बारामतीत पत्नीला लढवणे ही आपली चूक होती असे वक्तव्य केले होते. या वक्तव्यामागे एक मार्केटिंग कंपनी असल्याची चर्चा झाली. दादांच्यासारखा व्यक्ती अशा प्रकारे थेट कबुली देऊ शकतो. यामागे मार्केटिंग पॉलिसी होती असे म्हणणे त्यांच्यावर अन्याय करणारे ठरेल. मात्र आपण भावनिक नाही असे दाखवण्याचा दादांचा प्रयत्न त्यांना मोक्याच्या क्षणी धोक्यात टाकतो हे सोमवारी दिसून आले.

बारामतीत कणेरी येथील मारुतीच्या साक्षीने प्रचार शुभारंभ करताना दादांचा कंठ दाटून आला. लोकांना भावनिक होऊ नका असे म्हणणारे ते दादा हेच का? असाही प्रश्न निर्माण झाला. पुतणे युगेंद्र पवार यांच्या विरोधात होणारी लढत दादांना अस्वस्थ करणारी ठरली आणि त्यांनी आपल्या मातेला ही लढत नको होती असे वक्तव्य केले. तर त्यांची सभा होताच बंधू श्रीनिवास पवार यांनी, आईने असे काहीही म्हटलेले नाही असा खुलासा करून दादांना खोटे पाडण्याचा प्रयत्न केला. पवारांच्या घरातील ही भाऊबंदकी गेल्या काही दिवसात बारामतीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र पाहतो आहे. गेल्या काही वर्षात ठाकरे कुटुंबातील भाऊबंदकी महाराष्ट्राने अनुभवली आहे. बाळासाहेबांच्या पश्चात दोन्ही बांधवांना एकत्र येण्याचे अनेकांचे प्रयत्न फसले. आता त्यांच्यातील राजकारण एका टोकाला पोहोचले आहे. उद्धव ठाकरे यांच्या उमेदवाराच्या रत्नागिरी सिंधुदुर्गमधून पराभवासाठी राज ठाकरे यांनी नारायण राणे यांच्या प्रचारार्थ सभा घेऊन दाखवली. एकनाथ शिंदे यांच्यासाठी सुद्धा ते वेळोवेळी धावून गेले. आता भाजप त्यांच्या मुलासाठी धावून येण्याच्या तयारीत आहे. एकेकाळी गोपीनाथ मुंडे आणि धनंजय मुंडे या चुलत्या पुतण्यामधील मतभेद, पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांची लढाई हे महाराष्ट्राने अशाच दुःखी अंतकरणाने पाहिले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड विधानसभा मतदारसंघातून दोनदा आमदार झालेले हर्षवर्धन जाधव यांच्या विरोधात सध्या त्यांच्या पत्नी निवडणूक लढवण्याच्या तयारीत आहेत. त्या माजी राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांच्या कन्या असून मतदारसंघ शिंदे सेनेच्या वाट्याला गेल्याने त्यांनी नुकताच शिंदे सेनेत प्रवेश केला. २०१९ सालापासून विभक्त असणारे हे प्रतिस्पर्धी आता निवडणुकीच्या मैदानात लोकांचे प्रश्न मांडणार की आपल्या घरातली भांडणे सांगणार? हा प्रश्नच आहे. विधानसभा निवडणुकीत बापा विरुद्ध मुलगी सुद्धा लढणार आहे. लोकसभा निवडणुकीत कोल्हापुरात छत्रपती शाहू महाराज आणि त्यांचे पुत्र संभाजी राजे छत्रपती यांच्यात लढत व्हावी असा देखील कुटील डाव काही मंडळींनी टाकून पाहिला होता. मात्र योग्य वेळी संभाजीराजे यांनी संयमाची भूमिका घेतली आणि कोल्हापूरचा छत्रपती घराण्यातील ही नामुष्कीजनक घटना टळली.

गेल्या अनेक वर्षांपासून साताऱ्यात छत्रपती उदयनराजे आणि शिवेंद्रराजे यांच्यामध्ये टोकाचे मतभेद आहेत. दोघांच्या गटांमध्ये प्रत्येक निवडणुकीत होणाऱ्या हाणामाऱ्या गेल्या काही दिवसात शांततेत परावर्तित झाल्या आहेत. प्रत्येक वेळी कार्यकर्त्यांचे सण, उत्सव जेलमध्ये किंवा अटक टाळण्यासाठी घर सोडून गायब व्हायचे हा इथला शिरस्ता होता. मात्र या दोघांच्या मनोमिलनाने तूर्तास तरी लोक सुखी, समाधानी आहेत. नेतृत्व करणाऱ्या घराण्यांमध्ये वाढत जाणारी सत्ता स्पर्धा, त्या स्पर्धेतून वैयक्तिक संबंध सुद्धा दुरावत जात असल्याने राज्याच्या कानाकोपऱ्यात मोठे भावनिक तिढे निर्माण झालेले आहेत. कधीकाळी राज ठाकरे यांच्याबाबत हळवे होणाऱ्या बाळासाहेब ठाकरे यांना कर्तव्यकठोर झालेले आणि माझे छायाचित्र, नाव वापरू नको असे सांगितलेले महाराष्ट्राने पाहिले आहे. आपल्या विठ्ठलाला बडव्यांनी घेरले आहे असे भावनिक होऊन सांगणाऱ्या राज ठाकरे यांना टोकाची टीका करताना तर त्यांची खिल्ली उडवताना उद्धव ठाकरेंना पाहिले आहे. सध्या कर्तव्यकठोर होण्याची वेळ शरद पवारांच्यावर आलेली आहे. राजकारणात वेळोवेळी त्यांनी आपल्या कठोर निर्णयांचा प्रत्यय आणून दिलेला आहे. अनेक वेळा अजित पवार यांच्या पाठीशी उभे राहिलेले शरद पवार पक्षातील फुटीनंतर आता त्यांच्यासमोर उभे आहेत आणि आपण जिद्दीने लढतोय हे दाखवून देण्यासाठी न्यायालयापासून सभेच्या मैदानावर सुद्धा ते एकट्याने उभे असलेले दिसत आहेत. राजकारणासाठी नाती पणाला लावली गेली तर काय होते ते महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात निवडणुकीच्या रणांगणात दिसते आहे. लढण्याचे कर्तव्य प्रत्येकाला पार पाडायचे आहे आणि समोर कोण आहे याची तमा बाळगायची नाही. ही वाक्ये महाकाव्यासाठी शोभून दिसतात. प्रत्यक्षातील जीवनात यामुळे होणारी होरपळ खूप मोठी असते. त्याचे परिणामही खूप दूरगामी असतात. महाराष्ट्रातील राजकीय घराण्यांमध्ये सुरू असणारे हे वाद घराघरात घुसू पाहत आहेत. नेत्यांवर जीव ओवाळून टाकणारे कार्यकर्ते यामध्ये होरपळून निघत आहेत. अशा लढाया नेत्यांना शोभत असल्या तरी कार्यकर्त्यांना परवडणाऱ्या नसतात. शेवटी दगड धोंड्यांना, कोर्टबाजी आणि खटल्यांना सामोरे जाण्याची वेळ कार्यकर्त्यांवर येत असते. घटना क्षणात घडून जाते आणि त्याविषयीचे खटले वर्षानुवर्षे छळत राहतात. त्यातून अनेकांची सुटका मृत्यू आला तरी होत नाही. दुर्दैवाची वेळ आता थांबली पाहिजे. नेत्यांनीच याचा विचार केला पाहिजे.



बीडः बहुजन महा पार्टीच्या वतीने केज विधानसभा मतदारसंघातून प्रदेशाध्यक्ष अशोक भागोजी थोरात यांनी मंगळवारी अर्ज दाखल केला.

# महायुतीकडून आ.प्रकाश सोळंके यांनी तर महाविकास आघाडीच्या वतीने मोहन जगतापांनी केला उमेदवारी अर्ज दाखल

## शेवटच्या दिवशी ३१२ अर्ज विक्री तर ९० जणांकडून उमेदवारी अर्ज दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

**माजलगाव विधानसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी दोन प्रमुख पक्षाचे उमेदवार विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांनी अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीकडून तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे मोहन जगताप यांनी महाविकास आघाडीकडून दि २९ ऑक्टोबर मंगळवार रोजी सकाळी ११:३० वाजण्याच्या सुमारास कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता साध्या पणाने उमेदवारी अर्ज दाखल केले. दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी एकुण ३१२ उमेदवारी अर्ज विक्री झाले तर दुपारपर्यंत ९० जणांकडून उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.**

माजलगाव विधानसभेसाठी दि.२९ ऑक्टोबर मंगळवार रोजी उमेदवार अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. दुपारपर्यंत एकुण ३१२ उमेदवारी अर्ज विक्री झाले आहेत. तर ९० जणाऊ उमेदवारी अर्ज दाखल आहेत. दरम्यान सकाळी ११:३० वाजण्याच्या सुमारास विद्यमान आ.प्रकाश सुंदरराव सोळंके यांनी अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस गट,शिवसेना शिंदे गट व भाजपा महायुतीकडून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत माजी आ.आर टी देशमुख,भाजपाचे तालुकाध्यक्ष अरुण राऊत,शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, माजी सभापती तथा पुतणे जयसिंग सोळंके, बाजार समितीचे सभापती तथा विधानसभा अध्यक्ष जयदत्त नरवडे, बाजार समितीचे माजी सभापती तथा तालुकाध्यक्ष संभाजी शेजुळ, प्रताप रांजवण, पंचायत समितीचे माजी उपसभापती डॉ.वसिम मनसबदार, अच्युत लाटे, नासेर खॉ. पठाणसह आदींची उपस्थिती होती.तर मोहन जगताप यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट,उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना,राष्ट्रीय काँग्रेस पक्ष महाविकास आघाडीच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत माजी आमदार बाजीराव जगताप,माजी आमदार उषाताई दराडे,खा.बजरंग सोनवणे, माजी नगराध्यक्ष सहाल चाऊस, माजलगाव नगराध्यक्ष धारुर अर्जुन गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस दयानंद स्वामी, जिल्हा सरचिटणीस कचरू खळगे, इत्यादींची उपस्थिती होती.या दोन्ही प्रमुख तगड्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल साध्या पद्धतीने केला.परंतु यावेळी दोन्ही नेत्यांच्या कार्यकर्त्यांत उत्साह,जल्लोष मात्र मोठ्या प्रमाणात दिसून येत होता.आ.प्रकाश सोळंके यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना लाडक्या बहिणींची गर्दी दिसून आली. यावेळी त्यांचे कार्यकर्ते शेख आसेफभाऊ यांनी त्यांच्या मित्र मंडळाच्या वतीने लाडक्या बहिणींची मोठी गर्दी केली होती. लाडक्या बहिणींचा साक्षीने आ.सोळंके यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

# महाभ्रष्ट भाजपायुती सरकारला सत्तेतून बाहेर काढणे हेच मविआचे ध्येय-नाना पटोले यांचा इशारा

नागपूर । प्रतिनिधी

**भाजपा सरकारच्या काळात महागाई, बेरोजगारी प्रचंड वाढली, शेतकरी उद्ध्वस्त झाला, महिला सुरक्षित नाहीत, पण भाजपा युती सरकारला त्याची काळजी नाही. गरिबांना हक्काची जमीन मिळावी यासाठी लढा देऊन आपण वन हक्क कायदा आणला पण गरिबांना जमिनी देण्यापेक्षा भ्रष्ट भाजपा सरकारने अदानी, अंबानीला जमीन देण्यास प्राधान्य दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान संपवण्याचे काम भाजपा सरकार करत आहे. छत्रपती शिवाजी महाराज, शाहु, फुले, आंबेडकरांच्या विचाराला गाडणाऱ्या भाजपा युती सरकाला जमिनीत गाडणे हाच आमचा उद्देश असून या सरकारला खाली खेचून मविआचे सरकार आणण्यासाठी साकोलीतून रणशिंग फुंकले आहे, असे नाना पटोले म्हणाले.**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी मंगळवारी साकोली विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करण्यासाठी निघालेल्या रॅलीत हजारो लोक उपस्थित होते. त्याआधी सकाळी नाना पटोले यांनी चारभट्टीचा बजरंगबली आणि गोपीपुरी बाबाच्या समाधीवर जाऊन दर्शन घेतले तसेच आईचे आशीर्वादही घेतले. अर्ज दाखल करण्यास जाण्याआधी पत्नीने नाना पटोले यांचे औक्षण केले यावेळी कुटुंबातील सर्व सदस्य आणि सहकारी आवर्जून उपस्थित होते. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, युपीएससीच्या परीक्षा न घेता आरएसएसच्या विचारसरणीच्या मुलांची थेट



संयुक्त सचिव पदावर भरती केली जात आहे. एमपीएससीच्या माध्यमातूनही रिक्त जागा वेळेवर भरल्या जात नाहीत. राज्यात शासकीय व निमशासकीय कर्माचाऱ्यांची भरती आता ठेकेदारी पद्धतीने सुरु करून मागासवर्गीयांचे या नोकऱ्यातील आरक्षण संपवले जात आहे. जिल्हा परिषदेच्या शाळाही बंद करण्याचा घाट घातला आहे. श्रीमंतापेक्षा गरिबांना जास्त कर द्यावा लागतो, हे सर्व पाप भाजपा सरकारचे आहे. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर एमपीएससी मार्फत सर्व जागा भरल्या जातील तसेच परिक्षेसाठी नाममात्र शुल्क आकारले जाईल. परिक्षेच्या नावाखाली विद्यार्थ्यांना लुटले जाणार नाही. महिलांना भाजपा सरकार जी मदत करत आहे त्याच्यापेक्षा जास्त मदत देऊ, महागाई कमी करण्याचा प्रयत्न करु, असे ते म्हणाले. यावेळी माजी मंत्री बंडू सावरबांधे, सतीश चतुर्वेदी, आमदार अभिजित वंजारी, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष वजाहत मिर्झा, प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मोहन पंचभाई यांच्यासह महाविकास आघाडीचे नेते पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरून...

### साखरेच्या दरातील घसरणीने

दर आणि बँकांकडून मिळणारी उचल पाहिली तर कारखान्यांना तीन हजार रुपये मिळू शकतात. त्यामुळे अनेक कारखान्यांपुढे आगामी काळात एफआरपी देण्यावरून पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. दरवाढीच्या भीतीने साखरेचा साठा श्रावण व गणेशोत्सवाच्या काळात साखरेला तेजी होती, आगामी दसरा व दिवाळीत साखर आणखी उसळी घेणार, अशी भीती व्यापाऱ्यांना वाटल्याने त्यांनी कोटा कमी केला, त्याचा परिणाम सध्या दिसत असल्याचे जाणकारांचे मत आहे. गेल्या दोन तीन महिन्यात शासनाने कोटा जास्त दिला होता. सण असल्याने साखर कोटा संपूण जात होता. परंतु या महिन्यात सण असूनही साखर शिल्लक राहिली. तसेच आगामी काळात थंडीमुळे शित पेयांसाठीची साखर मागणी कमी होण्याची शक्यता आहे.

---------------

### बीडची जागा मुंडे बहीण-भावाने

तालुकास्तरीय पदाधिकारी, आजी-माजी जि.प.सदस्य, पं.स.सदस्य, सरपंच, नगरसेवक यांच्यासह कार्यकर्ते उपस्थितीत होते. भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख म्हणाले, डॉ.योगेश क्षीरसागर हे भावी नसून फिक्स आमदार आहेत. लोकसभा निवडणुकीमध्ये आ.पंकजाताई मुंडे यांचे प्रामाणिकपणे काम केल्याचे त्यांना फळ मिळेल, असे मत व्यक्त केले. तसेच, पंकजाताईंसह उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, ना.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली डॉ.योगेश क्षीरसागर यांना गुलाल लावल्याशिवाय राहणार नाही, असा निर्धार राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. तसेच, मित्र पक्षाच्या जिल्हाध्यक्ष, पदाधिकाऱ्यांनी विजयासाठी शुभेच्छा देऊन ताकदीने महायुतीला सत्तेत आणू, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी कार्यकर्त्यांची मोठी गर्दी होती.

**सर्वांना सोबत घेऊन निवडणूक लढविणार-डॉ.योगेश क्षीरसागर**

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी विकासाच्या मुद्द्यावर निवडणुकीला सामोरे जाणार आहे. मी आजपर्यंत केलेल्या कामाची पावती मला जनता देईल. महायुतीमधील सर्व मित्र पक्षाचे पदाधिकारी, सहकाऱ्यांना सोबत घेऊन काम करू, असे मत डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

---------------

### माझ्यात आणि संजय भाऊंमध्ये

आहे. २०१४ व २०१९ या दोनही विधानसभा निवडणुकीत आम्ही दोघे सोबत होतो. एकदिलाने आम्ही एकत्र काम केले. २०१९ च्या निवडणुकीत मी विजयी झालो, त्यात संजय भाऊंचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांनंतर संजय भाऊंना पण विधानपरिषद सदस्यत्वाची संधी मिळाली. आता पुन्हा मी विधानसभा निवडणुकीत सामोरा जात आहे, तेव्हा संजय भाऊ हे पूर्ण ताकदीने माझ्या सोबत आहेत, याचा मला मनापासून आनंद आहे, असे धनंजय मुंडे यांनी यावेळी बोलताना म्हटले आहे. आगामी काळात पक्ष संजय भाऊंना आणखी उत्तम संधी मिळवुन देईल, असा विश्वासही धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला. धनंजय मुंडे हे माझे बंधू आहेत. मागच्या आठवड्यात मी माझ्या सहकाऱ्यांशी चर्चा केली आणि आज धनंजय मुंडे यांच्या पाठीशी उभा राहण्याचा निर्णय मी जाहिर करत आहे. धनंजय मुंडे यांची ही निवडणूक ही माझी निवडणूक आहे, असे समजून मी पूर्ण क्षमतेने प्रचाराच्या मैदानात उतरणार असल्याचे माजी आ.संजय दौंड यांनी यावेळी बोलताना सांगितले. मुंडे-दौंड कुटुंबातील स्नेह कधीच कमी होणार नाही, आम्ही कायम एकदिलाने काम करत राहू, असेही धनंजय मुंडे म्हणाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर आबा चव्हाण, ज्येष्ठ नेते दत्ता आबा पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे परळी विधानसभा अध्यक्ष गोविंदराव देशमुख, शिवाजी सिरसाट, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, विश्वाम्भर फड, रणजित लोमटे, राजवर्धन दौंड यांसह प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

-----------

### आता सुट्ट - सुट्टच खेळू - होऊन

मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आता तुमच्या म्हणण्याप्रमाणे सुट्ट - सुट्टच खेळूयात, पाहु मतदार कोणाला कौल देतात ते कळेलच, तसेच आष्टी येथे ६ नोव्हेंबर रोजी आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील मतदारांची जाहीर सभा घेऊन प्रचाराचा नारळ फोडण्यात येणार आहे असे माजी आ. भीमराव धोंडे यांनी सांगितले. याप्रसंगी व्यासपीठावर युवा नेते अजयदादा धोंडे, जेष्ठ नेते लालाभाऊ कुमकर,माजी जि. प. सदस्य अशोक सव्वाशे,माजी सभापती साहेबराव म्हस्के, माजी जि. प. सदस्य अनुरथ सानप,माजी सरपंच बाळासाहेब पवार, जेष्ठ नेते बबनराव झांबरे,जि. प. सदस्य रामराव खेडकर,माजी सरपंच बबनराव औटे,माजी सभापती नियामत बेग, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, युवराज सोनवणे,जि. प. सदस्य रामदास बडे, देविदास शेंडगे,ॲड. रत्नदिप निकाळजे, हरिभाऊ तांदळे व इतरांची उपस्थिती होती. पुढे बोलताना माजी आ. भीमराव धोंडे सांगितले की, मी १९८० सालच्या निवडणुकीतही मी अपक्ष उमेदवार होतो व माझ्यासमोर आजी आणि माजी आमदार उमेदवार होते त्यावेळी मी मोठ्या मतांच्या फरकाने विजयी झालो होतो. आजही तीच परिस्थिती आहे त्यामुळे माझा विजय निश्चित आहे आणि मतदारसंघातील दहशत कमी करण्यासाठी सर्वांनी एक दिलाने काम करण्याचा सल्ला माजी आमदार भीमराव धोंडे यांनी दिला. यावेळी कालच दुःखत निधन झालेले मतदारसंघाचे माजी आमदार निवृतीराव उगले यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कै. निवृत्तीराव उगले हे अतिशय सरळ आणि विकासाची दृष्टी असलेले व्यक्तिमत्व होते असे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले. यावेळी माजी जि.प. सदस्य अशोकराव सव्वाशे यांनी सांगितले की माजी आ. भीमराव धोंडे यांना या निवडणुकीत अतिशय पोषक असे वातावरण आहे. ज्येष्ठ नेते बबनराव झांबरे म्हणाले की सामान्य माणसांसाठी कल्याणकारी योजना राबवणारे मा. आ.भीमराव धोंडे एकमेव व्यक्ती आहेत. मतदारांना पुन्हा एकदा धोंडे साहेबांना आमदार करण्याची चांगली संधी आलेली आहे. किशोर खोले यांनी सांगितले की, गेल्या विधानसभा निवडणुकीत आणि लोकसभा निवडणुकीत भाजपच्या उमेदवाराला पराभूत करणाऱ्या व्यक्तीला भाजपाने उमेदवारी दिली आहे. माजी सभापती साहेबराव मस्के यांनी सांगितले की भीमराव धोंडे हे एक वटवृक्ष आहेत आपण त्यांच्या पारंब्या आहोत त्यामुळे वटवृक्ष आपल्याला शाबूत ठेवण्यासाठी सर्वांनी अहोरात्र कष्ट करून निवडणूक जिंकायचीच. २०१४ ते २०१९ या काळात आष्टी येथील पोलीस स्टेशनला कमी गुन्हे नोंद झाल्याबद्दल पुरस्कार मिळाला होता. मा. आ. भीमराव धोंडे हे सर्वसामान्य माणसाला चांगली वागणूक देणारे व्यक्तिमत्व आहेत. माजी सरपंच संतोष चव्हाण यांनी सांगितले की मागच्या वेळी जाणीवपूर्वक केलेल्या पराभवाचा बदला घेण्याची नामी संधी आली आहे याचा कार्यकर्त्यांनी आणि मतदारांनी लाभ घ्यावा. याप्रसंगी माजी सरपंच बाळासाहेब पवार, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, रामराव खेडकर, रामदास बडे, नियामत बेग,माऊली पानसंबळ, अशोकराव साळवे, ग्रा. पं. सदस्य बाळासाहेब देशमुख,बबन आनेराव, राजपाल शेंडगे,हरिभाऊ तांदळे,बाबासाहेब गर्जे,बबनराव सांगळे, सरपंच दादासाहेब जगताप व इतरांची भाषणे झाली. या बैठकीस जि. प. सदस्य सुरेश माळी, दिलीपराव म्हस्के, संभाजी जगताप, विठ्ठलराव बनसोडे , छगनराव तरटे,बजरंग कर्डिले, इंजि.बडे, चेअरमन राजेश धोंडे,, ॲड. खेडकर, माजी सरपंच राहुल जगताप, सरपंच अभय गर्जे, , नानाभाऊ वाडेकर, संजय धायगुडे, माजी सरपंच अमोल चौधरी, सरपंच सावता ससाणे, पांडुरंग गावडे, माजी जि. प. सदस्य सतिश झगडे, माजी सरपंच नवनाथ सानप, रावसाहेब लोखंडे, माजी सभापती काकासाहेब लांबरुंड, सरपंच ज्ञानेश्वर केदार, बाबा वाघुले, सरपंच ज्ञानेश्वर वाघ, हरिभाऊ जंजिरे, संजय कांकरिया, आस्ताक शेख,विकास वनवे, अंकुश मुंढे, विठ्ठल लांडगे, सदाशिव दिंडे, मोहनराव घुले,सुदाम झिंजुर्के, माजी सभापती अनिल जायभाय, अज्जुभाई शेख, चेअरमन दादासाहेब हजारे, हादि शेख, संदीप नागरगोजे, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, चेअरमन अरुण सायकड, बाजीराव वाल्हेकर, बाबुराव कदम व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.सुत्रसंचलन माजी सरपंच बाळासाहेब पवार व डॉ मुश्ताक शेख यांनी केले.

--------------

### अखेरच्या दिवसापर्यंत

संघातून २६ उमेदवारांनी ३६ अर्ज, तर परळी मतदारसंघातून २४ उमेदवारांनी ३२ अर्ज दाखल केले. आजपर्यंत बीड जिल्ह्यातील गेवराई मतदार संघातून ४९ उमेदवारांनी ७८ अर्ज, माजलगाव मतदार संघातून १०४ उमेदवारांनी १३८ अर्ज, बीड मतदार संघातून ९५ उमेदवारांनी १३८ अर्ज, आष्टी मतदार संघातून ५६ उमेदवारांनी ७४ अर्ज ,केज मतदार संघातून ४७ उमेदवारांनी ६६ अर्ज तर परळी मतदारसंघातून ५८ उमेदवारांनी ७२ अर्ज दाखल केले. यात सर्वात जास्त अर्ज माजलगाव व बीड मतदार संघातील आहेत.

----------

### राजस्थानची संस्था देते बीडच्या

किमान २०० ते ३०० गावे आहेत प्रत्येक गावातून पाच लोक या नियमाने प्रशिक्षणाला हजार ते पंधराशे लोक उपस्थित राहणे गरजेचे आहे. या प्रशिक्षणासाठी किमान १५ ते २० हॉल असणे आवश्यक आहे. मात्र स्वच्छ भारत मिशनच्या तालुकास्तरावरील कर्मचाऱ्यांना सांगून गावागावात निरोप दिले जातात. हे निरोप अनेकांना पोहोचतही नाहीत. किंवा याकडे दुर्लक्ष केले जाते .त्यामुळे या प्रशिक्षणाला २०० ते ३०० च्या वर लोक उपस्थित राहत नाहीत. विशेषतः ग्रामसेवक आणि सरपंचांची संख्या फारच कमी असते. त्यामुळे कमाल ३०० लोक उपस्थित राहतात.या प्रशिक्षणाला हजार ते बाराशे लोक उपस्थित राहणे आवश्यक असतानाही या प्रशिक्षणाला येण्यासाठी लोक इच्छुक नाहीत .कारण प्रशिक्षण देणारे मास्टर ट्रेनर येथे योग्यतेचे असत नाहीत. थातूरमातूर प्रशिक्षकाच्या प्रशिक्षणाला लोक येत नाहीत. गेल्या काही दिवसापासून हे प्रशिक्षण चालू आहे. मागील प्रशिक्षणाला प्रत्येक तालुक्यामध्ये जास्तीत जास्त ३०० लोकांची उपस्थिती होती. यापूर्वी असे तीन प्रशिक्षण जिल्ह्यात झाले. याची देयके कोट्यावधीच्या घरात असतात.नियमानुसार देयके केली तर ती वीस ते पंचवीस लाखाच्या पुढे जाणार नाहीत. मात्र बोगस उपस्थित दाखवून कोट्यावधी रुपयाची देयके ही संस्था उचलून घेऊन जाते. याच्यावर जिल्ह्यातील अधिकाऱ्यांचे नियंत्रण नाही. त्यामुळे प्रशिक्षण कुठे झाले कसे झाले याबाबत अनेकदा अधिकाऱ्यांनाच माहीत नसते. केंद्राकडून हे प्रशिक्षण आहे असे सांगितले जाते मात्र ज्यांना प्रशिक्षण द्यायचे आहे ते आपल्या जिल्ह्यातील आहेत. पैसा आपल्या जिल्ह्यातून जाणार असतो. मुंबईत बसून देएके दिली जात असली तरी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अहवाला शिवाय ही देएके दिली जात नाहीत. हे तितकेच खरे त्यामुळे वस्तुनिष्ठ अहवाल जाण्यासाठी या यंत्रणेचे संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन वस्तुनिष्ठ अहवाल कसा जाईल याची काळजी घेतली पाहिजे. मात्र ही काळजी घेतली जात नाही. त्याच्या पाठीमागचे गोड बंगाल काय हे नेमके कळत नाही. स्वच्छ भारत मिशन कडे प्रत्येक विभागासाठी प्रशिक्षण देणारे कर्मचारी उपलब्ध आहेत. त्यांना सरकार पगारही देते तरीही हे प्रशिक्षण बाहेरच्या संस्थेला कशासाठी? हा मोठा प्रश्न आहे. का केवळ गुत्तेदार जगवण्यासाठीच हे प्रशिक्षण आहे हे ही कळत नाही. मराठी भाषेतून प्रशिक्षण राजस्थानी लोक कसे काय देणार?हा मोठा प्रश्न आहे. जर मास्टर ट्रेनर द्वारे प्रशिक्षण दिले तर त्यांना किमान दिवसाला पाच हजार रुपये मानधन द्यावे लागते. मात्र यातही काटकसर करून हजार पाचशे रुपये घेणारे थातूरमातूर ट्रेनर प्रशिक्षणासाठी उभे केले जातात .आणि त्यांच्या मार्फत हे प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे याचा ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांना फारसा उपयोग होत नाही. अशा पद्धतीने केवळ पैसे उकळण्यासाठी प्रशिक्षण असल्याचे स्पष्ट होत आहे. हे या प्रशिक्षणासाठी जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत मिशन यंत्रणेचा वापर केला जातो. तालुकास्तरावर सर्वांना निरोप देणे त्यांना प्रशिक्षणासाठी बोलावणे या सर्व बाबीसाठी शासकीय यंत्रणा वापरली जाते. जर शासकीय यंत्रणा वापरली जात असेल तर मग मास्टर ट्रेनर जिल्हा परिषदेला मिळत नाहीत काय ?असा प्रश्न उपस्थित होत आहे. या सर्व बाबींची तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्याकडे केल्यानंतर त्यांनी याची सखोल चौकशी करून जेवढे आवश्यक आहेत तेवढीच देयके दिली जातील असे आश्वासन पत्रकारांना दिले.

------------

### माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर

जयदत्त क्षीरसागर यांनी केले. माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांनी मंगळवारी सकाळी ११ वाजता बीड विधानसभा मतदारसंघाचा आपला अपक्ष उमेदवारी अर्ज साध्या पध्दतीने दाखल केला. यावेळी त्यांच्या समवेत जगदीश काळे, रोहीत क्षीरसगर, हेमंत क्षीरसागर, विलास बडगे, दिनकर कदम, अरूण डाके, गंगाधर घुमरे, गणपत डोईफोडे, विलास विधाते, उषा सरवदे, अरूण बोंगाणे, मुखीद लाला, सखाराम मस्के, मनोज मस्के, राणा चौहाण यांच्यासह प्रमुख मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापुर्वी त्यांनी नवगण राजुरी येथील गणपती व श्री क्षेत्र नारायणगड येथे देव दर्शन घेऊन शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, जिवा महाले, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, राजमाता अहिल्याबाई होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्री संत भगवान बाबा, महात्मा बसवेश्वर, श्री संत गाडगे महाराज, महाराणा प्रताप, राजमाता जिजाऊ माँ साहेब, कृषि रत्न वंसतराव नाईक आदि महापुरूषांच्या पुतळ्यांना अभिवादन केले तसेच शहेंशाहवली दर्ग्यास चादर अर्पण केली. राज्यात सध्या काका-पुतण्यांची लढत आख्ख्या महाराष्ट्रात चालू आहे, यात किती काका आणि किती पुतणे हे अंकगणित नाही तर केमेस्ट्री आहे. लोकांना साथ कोणी दिली, लोकांची सेवा कोणी केली हे लोकांना माहिती आहे. कोण-कोण येत आहे ते लोकांना माहित आहे. टोलवाले, मटकेवाले, दारूवाले, गुटख्यावाले, क्लब वाले, पत्त्यावाले असे अनेकजण भावी आमदार होण्याचे स्वप्न पहात आहेत असा टोलाही त्यांनी लगावला.

--------------------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि.३० ऑक्टोबर २०२४


## सर्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्याने लालझरे यांना १० हजाराचा दंड



**जालना । प्रतिनिधी**

दि २८ ऑक्टोबर रोजी शहरातील रेल्वे स्टेशन रोड ते पित्ती पेट्रोल पंप रोडवर सार्वजनिक ठिकाणी श्री. नितीन शामराव लालझरे यांनी ट्रॅक्टरमध्ये कचरा भरुन खाली/रिकामे करतांना आढळुन आले. करिता सदरचे गैरकृत्य केल्यामुळे श्री. नितीन शामराव लालझरे यांच्याकडुन सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकल्याबाबत दहा हजार रुपये दंड आकारण्यात आला. सदरची कार्यवाही जालना शहर शहर महानगरपालिकेचे स्वच्छता विभाग प्रमुख पंडीत पवार, स्वच्छता निरीक्षक श्री. अशोक लोंढे व प्र. स्वच्छता निरीक्षक श्री. रविंद्र कल्याणी यांनी केली.

# महाटेट परीक्षा केंद्रांवर राहणार प्रशासनाची करडी नजर

### परीक्षा केंद्र संचालकांची परीक्षा पूर्व तयारी बैठक,बीड येथील १६ केंद्रांवर १० नोव्हेंबरला 'महाटेट' परीक्षा

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत आयोजित महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटेट) १० नोव्हेंबर २०२४ रोजी बीड येथील १६ परीक्षा केंद्रांवर घेतली जाणार आहे. या परीक्षेसाठी चोख व्यवस्था करा, अशा सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी केंद्र संचालक यांना केल्या.

महाटेट परीक्षा आयोजनाच्या अनुषंगाने परीक्षेसाठी नियुक्त परीक्षा केंद्र संचालकासह संबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्या बैठकीत श्री.जीवने बोलत होते. पोलीस विभागाचे उपअधीक्षक उमाशंकर कस्तुरे, प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी, माध्यमिक शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे,

उपशिक्षणाधिकारी मोहन काकडे, शिक्षण विस्तार अधिकारी भगवान सोनवणे, परीक्षा समन्वयक तुकाराम पवार यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

परीक्षा केंद्रांमध्ये प्रवेश करणाऱ्या प्रत्येक




### परीक्षा केंद्रांवर चोख व्यवस्था करा -आदित्य जीवने

परीक्षार्थींची व्यवस्थित तपासणी करूनच त्यांना परीक्षा केंद्रात प्रवेश द्यावा. प्रतिबंधित केलेली कोणतीही वस्तू त्यांच्यासोबत परीक्षा केंद्रामध्ये घेवू जावू नये, यासाठी प्रवेशद्वारावरील अधिकारी, कर्मचारी यांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. परीक्षेमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार घडू नये, यासाठी प्रशासनाची करडी नजर राहणार असून असा प्रकार आढळून आल्यास कोणाचीही गय केली जाणार नाही. त्यामुळे सर्वांनी आपल्यावर सोपविलेल्या जबाबदारीबद्दल योग्य माहिती घेवून ती जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी, असेही जीवने म्हणाले.

महाटेट परीक्षेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण लवकरच आयोजित केले जाणार आहे. यावेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे सर्वांनी काटेकोरपणे पालन करावे. परीक्षा केंद्रावर प्रवेश करताना कोणकोणती ओळखपत्रे ग्राह्य धरण्यात येणार याबाबतची सुस्पष्टता करून घ्यावी, असेही ते म्हणाले.

प्रारंभी परीक्षेच्या आयोजनाबाबत माहिती दिली. सकाळी १०.३० ते दुपारी १ या कालावधीत पेपर क्रमांक १ चे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी ५ हजार १६६ परीक्षार्थी असून १५ केंद्रांवर ही परीक्षा होईल. पेपर क्रमांक २ चे आयोजन दुपारी २.३० ते सायंकाळी ५ या कालावधीत करण्यात आले असून या परीक्षेला १० हजार ६२२ परीक्षार्थी उपस्थित राहतील. परीक्षा केंद्रावर प्रवेशासाठी प्रवेशपत्राशिवाय मतदान ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड, आधारकार्ड, वाहनचालक परवाना, पासपोर्ट, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, शाळा-महाविद्यालयाचे अद्ययावत ओळखपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहे, असे शिक्षणाधिकारी यांनी सांगितले.



## जीवन आधार वृद्धाश्रमात दिवाळी फराळाचे वाटप

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**


तालुक्यातील मौजे पिंपळा धायगुडा येथील जीवन आधार भक्तीप्रेम आश्रमात पेशवा प्रतिष्ठान यांच्यावतीने दिवाळी फराळ वाटप करण्यात आला. सामाजिक जाणीवेतून फराळ वाटप हा उपक्रम राबवण्यात येतो. प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी वृध्दांशी संवाद साधत त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. यावेळी कल्याणी कुलकर्णी, राजश्री पिंपळे, प्रतिक्षा जोशी,अपर्णा भालेराव,अनिता औटी, प्रणिता पोखरीकर, रोहिणी जड,वर्षा मिरगे ,गायत्री राडीकर राहुल कुलकर्णी, डॉ.महेश अकोलकर, श्रीकांत जोशी,केदार दामोषण,गौरव कुलकर्णी,गोविंद जोशी,अक्षय देशमुख,आदित्य राखे, डॉ प्रविण जोशी, अविनाश लहुीकर,ॲड वैजनाथ वांजरखेडे, आदी उपस्थित होते.

## जिल्हा रुग्णालयात धन्वंतरी पूजन करून रक्तदान भवनची निर्मिती व नावन्यपूर्ण उपक्रम

### सीएस डॉ.अशोक थोरात यांच्या आवाहनाला नागरिकांचा प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

जिल्हा रुग्णालयात येणारी रुग्ण संख्या मोठ्या प्रमाणावर पाहता सध्या जिल्हा रुग्णालयात रक्तपुरवठा विभागात रक्ताचा तुठवडा निर्माण झाला आहे त्यामुळे जिल्हा रुग्णालय प्रशासनाने रक्तदात्यांना व जिल्ह्यातील नागरिकांना रक्तदान करण्याचे आव्हान केले होते. त्याच धर्तीवर जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी आज जिल्हा रुग्णालयात ''रक्तदान भवन'' ची निर्मिती केली असून त्यांनी स्वतः रक्तदान केले. यावेळी रुग्णांसाठी रक्त घेऊन जाणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांनी सुद्धा रक्तदान केले




त्यामुळे त्यांचं जिल्हा रुग्णालय प्रशासनाच्या वतीने रक्तदान केल्याचं प्रमाणपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार ही करण्यात आला. सध्या जिल्हा रुग्णात ब्लड बॅग अत्यंत कमी असल्याने सर्वांनी रक्तदान करा असा आव्हान करण्यात आले जिल्हा शल्य चिकीसक डॉक्टर अशोक थोरात , डॉ प्रतिभा अशोक थोरात यांच्या हस्ते धन्वंतरी पूजन करून जिल्हा रुग्णालयात वाताकुल निर्मित ''रक्तदान भवन ''ची निर्मिती प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे

यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात, डॉ. प्रतिभा अशोक थोरात, डॉ. सुधीर राऊत,

डॉ.हनुमंत पारखे, डॉ. दिपाली कट्टे, डॉ.गवते मॅडम यांच्यासह रक्तपुरवठा विभागातील सर्व कर्मचारी अधिकारी यांची उपस्थिती होती.

## राज्याचे कृषिमंत्री ना. धनंजय मुंडे यांनी मोदी कुटुंबाचे त्यांच्या निवासस्थानी भेटून केले सांत्वन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या काकी तथा सुरेश मोदी यांच्या मातोश्री स्व सावित्रीबाई प्रकाश मोदी यांचे शनिवार दि २६ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले होते. त्याचा अंत्यविधी मंगळवार दि २९ रोजी सकाळी १० वाजता संपन्न झाला. यावेळी बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर तथा मोदी कुटुंबावर प्रेम करणारे अनेकजण उपस्थित होते. अंत्यसंस्कारास उपस्थित न राहता आल्याने दुपारी राज्याचे कृषिमंत्री ना धनंजय मुंडे यांनी मोदी कुटुंबाची त्यांच्या



निवासस्थानी सांत्वनपर भेट घेतली. भेटीदरम्यान धनंजय मुंडे यांनी स्व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार व पुष्पांजली अर्पण केला. यावेळी मोदी परिवारास धीर देऊन त्यांच्या दुःखात ते सहभागी असल्याचे सांगितले. त्याचबरोबर ईश्वर मोदी कुटुंबास निसर्गाने दिलेले दुःख पेलविण्याची शक्ती व बळ देवो अशी प्रार्थना केली.

या भेटीदरम्यान ना.धनंजय मुंडे यांच्या सोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड राजेश्वर चव्हाण,शिवाजी शिरसाट, गोविंद देशमुख हे होते. यावेळी निवासस्थानी स्वा रा ती चे मेडिसिन विभाग प्रमुख डॉ सिद्धेश्वर बिराजदार , प्रकाश सोळंकी, राजकिशोर मोदी, भूषण मोदी, सुरेश मोदी व संकेत मोदी, धनराज सोळंकी हे उपस्थित होते.

पान ६ वरून...

### सतीश घाटगेंची अखेर

येणाऱ्या अंबड जालना आणि घनसावंगीतील दुष्काळी गावांसाठी अतिशय महत्त्वाचा असलेला शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सतीश घाडगे यांनी लिफ्ट इरिगेशन प्रोजेक्ट जनतेसमोर मांडला या तिन्ही तालुक्यासाठी त्यांच्या संकल्पनेतून साकार झालेले हे लिफ्ट इरिगेशन प्रोजेक्ट निवडून आल्यावर पूर्ण करणार असा शब्द नामांकन सभेत सतीश घाटगे यांनी जनतेला दिला.

### वंचित बहुजन आघाडी

विधानसभा मतदार संघात निर्माण झाले आहे. उमेदवारी अर्ज दाखल करताना पुरुषोत्तम वीर यांच्यासोबत पक्षाचे नेते डॉ. नितीन सोनवणे, सुरेश पोतदार, युनूस शेख, एड.चंद्रमनी विर,महिला जिल्हाध्यक्ष एड.अनिता चक्रे,कल्पना गोरे,भीमराव पायाळ, सय्यद सुभानभाई,भूषण लोळगे, लखन तोडकर,अनिल वीर, मिलिंद इंनकर, सुशील काकडे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तुम्हीच म्हणाले ना सुट्ट

घुमरे हरिभाऊ दहातोंडे महादेव देवकी नामदेव शेळके यांनी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते यावेळी पुढे बोलताना म्हणाले की गेल्या पाच वर्षात मतदारसंघात साडेतीन हजार कोटीचे भरघोस निधी आणला असून यामध्ये आपण सिंचनाच्या कामाला जास्तीचे महत्व दिले असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले हा जर त्यांना आम्ही केलेला विकास दिसत नसेल तर हे दुर्दैव आहे माजी आमदार व सध्याचे असलेले मारुतीचे यांनी फक्त कामे अडवण्याचे काम केले आहे आणि जसा आमदार तुम्हाला पाहिजे असेल आपली काही हरकत नाही मला पैसे खाण्यासाठी आमदारकी नको आहे म्हणून या संधीचे सोनं करायचं आहे मुळात यांना तालुक्याला पाणी आणायचेच नव्हते फक्त देखावा करत होते आणि आणायचे होते तरी पंधरा वर्षे काय केले असा सवाल अगदी यांनी दासांचे नाव घेता विचारला तसेच आमच्या कार्यकर्त्यांना केसाला धक्का लागला तरी मी खोडावर घाव घालीन असा इशाराही बाळासाहेबांनी आक्रमकपणे दिला सभास्थळी ०२:२३ उमेदवारी जाहीर केली आजबे गैरसभा सुरू असतानाच बरोबर दोन वाजून २३ मिनिटांनी आपल्याला जाहीर करून आपण आता उमेदवारी दाखल करण्यासाठी रवाना होत आहे असेही सांगितले दासांनी अगोदरच जाहीर केलेले होते कुत्ते खेळा दरम्यान निवडणुका जाहीर होताच माजी मंत्री दस यांनी माहितीचे उमेदवार यांची गर्दी आणि चळवळ पाहून माझ्यासहित तिला नाही उमेदवारी अर्ज भरून त्या खेळाशी जाहीर केले होते त्यालाच आव्हान देतात आज त्यांनी देखील चला आता आपण दोघे सुट्टा खेळू असे जाहीर आव्हान दिले. एकंदरीत आजच्या घडामोडी पाहिल्या असता आतापर्यंत आष्टीच्या राजकारणात पहिल्यांदाच असा प्रसंग पाहावयास मिळाला पूर्णपणे गुप्तता पाळण्यात आली सभास्थळी वेगळ्या प्रकारचे बॅनर लावून आपण अपक्ष उमेदवारी लढवत असल्याचा अभ्यास केला व नंतर आपण राष्ट्रवादीचा बी फार्म असल्याचे जाहीर करून एकच खळबळ उडून गेली. यावरून आता आष्टी मतदार संघात विधानसभेच्या निवडणुकीमध्ये आता चांगलीच रंगत येत असून आता माजी आमदार भीमराव धोंडे हे देखील या निवडणुकीत अपक्ष अर्ज दाखल करून त्यांनीही आपला माघार घेत नसल्याचा जाहीर केले आहे आता चार नोव्हेंबर दिवशी अर्ज माघारी घेण्याच्या नंतर काय चित्र या मतदारसंघात होते हे आपण आता पाहू. यावेळी भाऊसाहेब लटपटे शिवाजी नाकाडे, शेळके मामा, शिरूर चे ढाकणे तसेच सेवानिवृत्त फौजी गळगटे यांची संचित भाषणे झाली या लोकांनी देखील सुरेश धस यांच्यावर तोफ डागली.

### लाडकी बहीण योजना

तर मंत्री निवडून देण्याची संधी तुम्हा सर्वांना आहे अशा शब्दात बबनराव लोणीकर पुन्हा एकदा महाराष्ट्र राज्याच्या कॅबिनेट मंत्रिमंडळात आपल्याला दिसतील असे सुतवाज यावेळी मुनगंटीवार यांनी दिले

आज परतुर शहरात माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी पंढरपूरची यात्रा भरावी असा जनसमुदाय उसळला होता २० हजार पेक्षा अधिक बंधू भगिनींनी आज लोणीकरांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रॅलीमध्ये सहभाग नोंदवला यामध्ये ज्येष्ठ नागरिक महिला भगिनींसह युवा बांधवांचा जल्लोष बघण्यासारखा होता ढोल ताशांच्या गजरात फटाक्यांच्या आतिषबाजी हाती विराट शक्ती प्रदर्शन करत आज आमदार बबनराव लोणीकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला यावेळी युवा कार्यकर्ते व महिलांच्या घोषणांनी परतुर शहर दणाणून गेले होते प्रसंगी बबनराव लोणीकर पुन्हा एकदा प्रचंड मताधिक्याने निवडून येतील असा विश्वास रॅलीमध्ये सहभागी असलेल्या नागरिकांनी व्यक्त केला

परतु विधानसभा मतदारसंघात महिला बचत गटाच्या माध्यमातून १ लाख १० हजार ७२० लाभार्थी महिलांना अर्थशाही उपलब्ध करून देण्यात आले असून त्या माध्यमातून महिलांनी वेगवेगळे व्यवसाय करत खंबीरपणे आपल्या पायावर उभा राहण्याचा प्रयत्न केला आहे त्यासाठी वारंवार बैठका घेऊन महिला बचत गटांना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी आमदार बबनराव लोणीकर यांनी सातत्याने प्रयत्न केले होते त्या माध्यमातून बचत गटाच्या महिलांच्या खात्यात ८० कोटी ४ लाख रुपयांचा निधी जमा झाला असल्याची माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या मनोगतात दिली.

# ग्राहकांच्या प्रचंड उत्साहात अरेबियन ज्वेलर्सचा लकी ड्रॉ संपन्न!

### १५०० हुन अधिक ग्राहकांची उपस्थिती; बदनाम करणाऱ्यांच्या तोंडावर चपराक!

**बीड़ । प्रतिनिधी**

ग्राहकांच्या विश्वासाच्या बळावर शहरातील आशीर्वाद लॉन्स येथे अरेबियन ज्वेलर्स यांच्या लकी ड्रॉचा पहिला सोहळा १५०० पेक्षा अधिक ग्राहकांच्या उपस्थितीत प्रचंड उत्साहात पार पडला. ग्राहकांच्या प्रचंड प्रतिसादामुळे अरेबियन ज्वेलर्सचे मनोबल उंचावले असून बदनामी करणाऱ्यांच्या तोंडावर सभासदांनी चपराक बसवली आहे.

शहरातील प्रसिद्ध अरेबियन ज्वेलर्स यांच्या वतीने बंपर लकी ड्रॉ आयोजित करण्यात आला होता. या लकी ड्रॉ मध्ये हजारो सभासदांनी नोंदणी करत अरेबियन ज्वेलर्स विश्वास दर्शवला.





शहरातील आशीर्वाद लॉन्स येथे अरेबियन ज्वेलर्स कडून प्रथम बंपर लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले होते. पंधराशे पेक्षा अधिक सभासदांच्या उपस्थितीत पारदर्शक प्रमाणे लकी ड्रॉ चे उद्घाटन करण्यात आले.

लकी ड्रॉ ची मुख्य आकर्षक असणारी क्रेटा कार कोणाच्या नशिबी असणार याची चर्चा आशीर्वाद लॉन्स मध्ये सभासदात होती संध्याकाळी सात नंतर लकी ड्रॉ ला सुरुवात झाली हजारो ग्राहक, सभासदांची ह्दयाचे ठोके वाढले, प्रथम पारितोषिकचे मानकरी कोण असणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते या लकी ड्रॉमध्ये क्रेटा कारचे मानकरी ठरले.प्रथम पारितोषिक

योगेश अदाने यांना तर द्वितीय पारितोषिकच्या मानकरी ठरल्या नीलिमा परमार . या सोहळ्यासाठी अरेबियन ज्वेलर्सचे संस्थापक मेहबूब मलीक रहमान यांची प्रमुख उपस्थिती होती. अरेबियन ज्वेलर्सच्या माध्यमातून शहरातील सभासदांसाठी भविष्यातही उत्कृष्ट व चांगल्या योजना घेऊन येणार असल्याचे मेहबूब मलीक रहमान यांनी यावेळी सांगितले. हजारो सभासदांच्या उपस्थितीमध्ये अरेबियन ज्वेलर्सचा प्रथम लकी ड्रॉ बक्षीस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

# अकरावे अंबाजोगाई साहित्य संमेलन पूर्व उपक्रम

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अकरावे अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या पुर्व उपक्रमांर्तगत मसाप शाखा अंबाजोगाई यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिक्षक कवी संमेलनास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संमेलन पुर्व उपक्रमांर्तगत घेण्यात येणा-या उपक्रमातील हा तिसरा उपक्रम अत्यंत देखण्या पध्दतीने साजरा झाला.

योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या नागापूरकर सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या शिक्षक कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी प्रा. संजय खाडप हे होते. या शिक्षक कवी संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमास स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार, स्वागत समितीचे सचीव प्रा. पंडीत कराड, मसाप कार्यकारिणी सदस्या प्रा. शैलजा बरुरे, मसाप सचीव गोरख शेंद्रे,परीक्षक प्रा. विष्णू कावळे, प्रा. अलका तडकलकर व संयोजक विजय रापतवार हे उपस्थित होते.

हे शिक्षक कवी संमेलन यशस्वी करण्यासाठी संयोजक विजय रापतवार व शिक्षक प्रतिष्ठान चे सचीव विष्णू सरवदे व त्यांच्या टीम ने उत्कृष्ट नियोजन केले होते. या शिक्षक कवी संमेलनात स्वागत समितीचे सदस्य वंदना तेलंग-कोपले, अश्रब पठाण, सुजाता सरवदे, चंद्रकला देशमुख, मसापचे




कार्यकारिणी सदस्य गोरख शेंद्रे, प्रा. शैलजा बरुरे, प्रा. विष्णू कावळे यांचा सहभाग महत्वपूर्ण होता.

२७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६:३० वाजता सुरू झालेले हे संमेलन रात्री ९:४५ वाजता संपले. या शिक्षक कवी संमेलनात जवळपास ३० कवींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

सुत्रसंचलन शिक्षक कवी- वात्रटिकाकार भागवत मसणे आणि शिक्षक कवयत्री शितल बोधले यांनी केले. या शिक्षक कवी संमेलनात अंबाजोगाई शहरात राहणाऱ्या शिक्षक-कवींचा मोठा सहभाग होता. यात सेवानिवृत्त शिक्षकांनीही

## शिक्षक कवी संमेलनास उत्स्फूर्त प्रतिसाद

आपला सहभाग नोंदवला. या कवी संमेलनात सहभागी झालेल्या कवींनी वेगवेगळ्या संदर्भावर रचलेल्या आपल्या कविता सादर केल्या. या शिक्षक कवी संमेलनाचा अध्यक्षीय समारोप करताना प्रा. संजय खाडप यांनी या शिक्षक कवी संमेलनामुळे शिक्षक शहरातील कवींना एक वेगळे व्यासपीठ उपलब्ध झाले असून ज्ञानदान आणि शासकीय कामकाजाच्या ओझ्याखाली दमलेल्या शिक्षक कवींना मोकळा श्वास घेण्याची एक चांगली संधी संयोजकांनी निर्माण करुन दिल्याबद्दल मसाप शाखा अंबाजोगाई, ११ वेळ साहित्य संमेलनाची स्वागत समिती यांचे मनःपूर्वक आभार मानले.

सहभागी शिक्षक कवी सोबत श्रोतावर्गात ही शिक्षक परीवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

शिक्षक कवी संमेलनाचे यशस्वी नियोजन केल्याबद्दल संयोजक विजय रापतवार व शिक्षक मैत्री प्रतिष्ठान चे अनेकांनी विशेष कौतुक व अभिनंदन केले. या शिक्षक कवी संमेलनास उपस्थित असलेल्या सर्वांचे आभार स्वागत समितीचे सदस्य अश्रब पठाण यांनी स्वरचित कवितेच्या माध्यमातून आपल्या सुंदर आवाज आणि सादरीकरणाच्या माध्यमातून मानले.

# कांद्याचे दर गडगडल्यामुळे बाजारसमितीत शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन

बेळगाव : बेळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत नवीन कांद्याचा दर गडगडल्यामुळे शेतकऱ्यांनी मुख्य प्रवेशद्वार बंद करून आंदोलन केले. दुपारी १२ वाजता सुरू झालेले आंदोलन सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत चालले. दर अचानक १ हजार ते १५०० रुपयांनी घसरल्यामुळे विजापूर, बागलकोटसह महाराष्ट्राच्या सीमाभागातील नवीन कांदा घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला. आंदोलनस्थळी बाजारसमितीचे अधिकारी व पोलीस दाखल झाले. त्यांनी आंदोलक शेतकऱ्यांची समजूत काढली. परंतु, शेतकरी आंदोलनावर ठाम होते. अखेर सायंकाळी ५.३० च्या दरम्यान आंदोलन मागे घेण्यात आले. दर्जानुसार कांद्याचा दर वाढवून देण्याचा निर्णय या बैठकीत झाला. त्यानुसार व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना दर वाढवून दिला.



यंदा ऑक्टोबरमध्येही जोरदार पाऊस झाला, त्यामुळे कर्नाटकातील विजापूर व बागलकोट भागांतील शेतकऱ्यांचा कांदा ओला झाला आहे. कांदा दर्जेदार नसल्यामुळे लवकर खराब होत आहे. त्यामुळे या कांद्याचा दर अचानक कमी झाला आहे. एपीएमसीचा बाजार प्रत्येक बुधवारी व शनिवारी होतो. मात्र, कांदा खराब असल्यामुळे पुन्हा सवाल केला. यावेळी ४ ते ४ हजार ५०० रुपये दर असलेला कांदा २ हजार ५०० ते ३ हजार रुपये प्रतिक्विंटलवर आला. त्यामुळे शेतकऱ्यांतून प्रचंड नाराजी व्यक्त करत आंदोलनाचा पावित्रा घेतला. शनिवारी चांगला दर असल्यामुळे शेतकऱ्यांनी सोमवारीही चांगला दर मिळेल, या आशेने कांदा मोठ्या प्रमाणात आणला होता. मात्र, पुन्हा लिलाव झाल्यामुळे कांदा दर गडगडला. बाजारात फक्त नवीन कांद्याचा दर गडगडला होता.

### वाहनांच्या लांबच लांब रांगा

प्रवेशद्वार बंद करून आंदोलनाला सुरुवात केली. यामुळे बाहेरच्या शेतकऱ्यांना आत जाता आले नाही. तसेच आतमध्ये किरकोळ बाजाराला गेलेल्या नागरिकांना मनस्ताप झाला. एपीएमसीचे दुसरे प्रवेशद्वारदेखील बंदच होते. प्रवेशद्वार बंद असल्यामुळे एपीएमसी पहिल्या प्रवेशद्वारापासून बॉक्साईट रोड व दुसऱ्या बाजुला कंग्राळी गावापर्यंत रस्त्याच्या दुतर्फा वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

जुन्या कांद्याला चांगला दर होता. बेळगावातील कांदा दिल्ली, मध्य प्रदेशसह विविध राज्यांत जातो. नवीन कांदा लवकर खराब होत असल्यामुळे त्या भागातील शेतकऱ्यांनी नवीन कांदा खरेदी केला नाही. तसेच काहींनी कमी दरात कांदा खरेदी केला. कमी दर मिळाल्यामुळे शेतकरी नाराज झाले. यावेळी बाजारसमितीचे अधिकारी निरंजन हिरेमठ, स्वप्नील तोडकर, पोलीस निरीक्षक ए. एस. अवटी, मंजुनाथ बजंत्री, त्रिवेणी रायकर आदी अधिकाऱ्यांनी यावर तोडगा काढत आंदोलन मागे घेण्यास भाग पाडले.

# रब्बी हंगामात लावा मक्याच्या सुधारीत जाती



रबी हंगामाची सुरुवात झालेली आहे. शेतकरी या हंगामात गहू, हरभरा सोबतच मक्याची देखील पेरणी करतात. यंदाही शेतकरी मोठ्या प्रमाणात मक्याची लागवड करणार आहेत. रब्बी हंगामात मक्याची पेरणी ही १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या एका महिन्याच्या कालावधीत केल्यास अधिकचे उत्पादन मिळवता येते. तसेच मक्याच्या काही सुधारित जातींची लागवड केल्यास देखील चांगले उत्पादन मिळते.

मक्याच्या सुधारित जाती : राजर्षी : महाराष्ट्रात उत्पादित होणारी ही मक्याची एक प्रमुख संकरित जात आहे. रब्बी हंगामात लागवडीसाठी मक्याच्या 'राजर्षी' या जातीची तुम्ही निवड करू शकता. या जातीचा पीक परिपक्व कालावधी १००-११० दिवसांचा आहे. संकरित जात असल्याने शेतकऱ्यांना यापासून चांगले उत्पादन मिळते. या जातीपासून शेतकऱ्यांना ५५ ते ६० क्विंटल प्रति हेक्टर पर्यंतचे उत्पादन मिळत असल्याचा दावा तज्ज्ञांनी केला आहे.

मांजरी : मक्याचा हा वाण रब्बी हंगामात लागवडीसाठी उपयुक्त असून या जातीचा पीक कालावधी ९०-११० दिवस आहे. या जातीपासून शेतकऱ्यांना ४० ते ५० क्विंटल/हे. एवढे दर्जेदार उत्पादन मिळवू शकतात. करवीर : करवीर या जातीची देखील महाराष्ट्रात लागवड होते. राज्यातील अनेक भागांमध्ये या जातीच्या मक्याची मोठ्या प्रमाणात शेती होत असल्याचे आढळून आले आहे. या जातीचा पीक परिपक कालावधी हा १००-११० दिवस आहे. उत्पन्नाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास या जातीपासून ४० ते ५० क्विंटल/हे पर्यंतचे उत्पादन मिळते.डेक्कन : ही देखील मक्याची एक सुधारित जात आहे. हा संकरित वाण राज्यातील अनेक भागांमध्ये लोकप्रिय आहेत. १०५ ते ११० दिवसात या जातीचे पीक तयार होते आणि हेक्टरी ५५ ते ६० क्विंटल पर्यंतचे उत्पादन देण्याची क्षमता या जातीची आहे.

# गाय आणि म्हशीच्या चाऱ्यात लाल शेवाळ मिसळल्यास दूध उत्पादन दुप्पट वाढते



गायी आणि म्हशींच्या संगोपनासाठी आणि देशातील दुधाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी सरकार दुधावर अनुदान देखील देते. असे असतानाही पशुपालकांना दूध बचतीतून पाहिजे तेवढा नफा मिळत नाही. चाऱ्याच्या दरात झालेली वाढ हेही यामागे एक प्रमुख कारण आहे. आज फार कमी प्रमाणात मोकळी कुरणे उरली आहेत, अशा स्थितीत पशुपालकांना हिरवा चारा विकत घेऊन जनावरांना द्यावा लागतो. त्यामुळे जनावरांच्या चाऱ्याची किंमत वाढल्या आहेत. अशा स्थितीत पशुपालक शेतकरी जनावरांना खास पशुखाद्य देऊ शकतात ज्यामुळे जनावरांच्या दुधाचे प्रमाण तर वाढेलच शिवाय पर्यावरणातील मिथेन वायूचे उत्सर्जन कमी होण्यास मदत होईल. व यातून पशुपालकांचे उत्पन्न देखील दुप्पट होईल.

तज्ज्ञांच्या मते गायी आणि म्हशी त्यांच्या तोंडातून सर्वाधिक मिथेन वायू उत्सर्जित करतात. ते ज्या प्रकारचा चारा खातात ते चघळण्याच्या पहिल्या टप्प्यात जास्त मिथेन वायू तयार करतात, आणि ते वातावरणात सोडतात. यामुळे वातावरणातील मिथेन वायूचे प्रमाण वाढते जे ग्लोबल वॉर्मिंग वाढवण्यास मदत करते. अशा परिस्थितीत जनावरांच्या आहारात 'लाल शेवाळ' वापरून मिथेन वायू निर्मिती कमी करता येते. लाल शेवाळापासून तयार केलेले खाद्य जनावरांना दिल्याने दुधाचे प्रमाणही वाढते.

लाल शैवालपासून प्राण्यांसाठी अन्न कसे तयार करावे? : पशुपालक बाजारातून लाल शैवाल असलेले खाद्य विकत घेऊ शकतात. जनावरांचा चारा बनवताना रेड अल्गी किती प्रमाणात घालायचे याची काळजी घ्यावी. जनावरांच्या आहारात आवश्यकतेपेक्षा जास्त लाल शेवाळ टाकल्यास त्याचे विपरीत परिणाम होऊ शकतात. उदाहरणार्थ, कट फीडमध्ये किती लाल शैवाल घालायचे हे लक्षात ठेवणे फार महत्वाचे आहे. तुम्ही बाजारातून पशुखाद्य विकणाऱ्या दुकानातून लाल शैवाल खाद्य विकत घेतल्यास, पशुखाद्य आणि त्याच्या वापराच्या पद्धती संबंधित सूचनाही त्याच्या पॅकेटमध्ये लिहिलेल्या सूचनांनुसार तुम्ही पशुखाद्य तयार करू शकता.

जनावरांना लाल शेवाळ खाद्य देऊन दुप्पट नफा कसा मिळवायचा? : जर पशुपालकांनी लाल शैवाल असलेले विशेष पशुखाद्य विकत घेतले, तर फीड पॅकेटमध्ये नंबर असलेला एक कोड दिसतो. हा कोड कंपनीच्या ॲपवर जाऊन सबमिट करावा लागेल. या संख्यात्मक संहितेवरून हे कळते की पशुपालकांनी आपल्या जनावरांना किती लाल शैवाल खायला दिले आहे, ज्यामुळे मिथेन वायूचे उत्सर्जन कमी होण्यास मदत झाली आहे. त्याच्या मदतीने, पशुपालकाने किती मिथेन वायू उत्सर्जित होण्यापासून रोखला आहे हे देखील समजेल. त्याच आधारावर पशुपालकांना क्रेडिट क्रमांक मिळेल. यानंतर, पशुपालक या क्रमांकांची विक्री करून रोख नफा देखील मिळवू शकतात. अशा परिस्थितीत जनावरांच्या दुधाची विक्री करून आणि लाल शेवाळयुक्त खाद्य असलेला आहार जनावरांना देऊन शेतकरी दुप्पट कमाई करू शकतात.

## दिन विशेष

### जागतिक दिवस: जागतिक बचत दिन

### महत्वाच्या घटना

१९२० : सिडनी येथे कम्युनिस्ट पार्टी ऑफ ऑस्ट्रेलियाची स्थापना.
१९२८ : लाहोर येथे सायमन कमिशनचा निषेध करणार्या लाला लजपतराय यांच्यावर ब्रिटिश पोलिसांनी लाठीहल्ला केला. त्यातच पुढे १७ नोव्हेंबर १९२८ रोजी त्यांचा अंत झाला.
१९४५ : भारताला संयुक्त राष्ट्रांचे सदस्यत्त्व मिळाले.
१९६० : ब्रिटन मध्ये पहिल्यांदा किडनीचे प्रत्यारोपण करण्यात आले.
१९६६ : शिवाजी पार्कवर शिवसेनेचा पहिला दसरा मेळावा झाला.
१९७३ : इस्तंबुलमधील बॉस्पोरस पूल पूर्ण झाल्यामुळे युरोप आणि आशिया जोडले गेले.
१९९५ : कॅनडातील क्वेबेक प्रांताने विभक्त होण्यासाठी घेतलेल्या सार्वमतात जनतेने ५०.६% विरुद्ध ४९.४% मतांनी कॅनडातच राहण्याचा निर्णय दिला.
२०१३ : सचिन तेंडुलकर आपल्या कारकिर्दीतील शेवटचा रणजी सामना खेळला. हरयाणाविरुद्ध झालेल्या या सामन्यात सचिनने विजयी फटका मारला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७३५ : जॉन ॲडम्स अमेरिकेचे २ रे राष्ट्राध्यक्ष आणि पहिले उपराष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ४ जुलै १८२६)
१८५३ : ब्रिटीश कालीन भारतातील प्रशासकीय अधिकारी व राष्ट्रवादी तसचं, भारतीय क्रांतिकारक संस्था अनुशीलन समितीचे प्रारंभिक सदस्य प्रमथनाथ मित्र यांचा जन्मदिन.
१८८७ : सुकुमार रॉय बंगाली साहित्यिक आणि 'संदेश' या लहान मुलांच्या मासिकाचे संस्थापक, चित्रपट दिग्दर्शक सत्यजित रॉय यांचे वडील (मृत्यू: १० सप्टेंबर १९२३)
१९०९ : डॉ. होमी जहांगीर भाभा भारतीय भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: २४ जानेवारी १९६६)
१९२१ : मध्य प्रदेश राज्याचे माजी राज्यपाल आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक राजकारणी भाई महावीर यांचा जन्मदिन.
१९३२ : भारतीय इतिहासकार आणि लेखक बरुन डी यांचा जन्म. (मृत्यू: १६ जुलै २०१३)
१९४९ : प्रमोद महाजन केन्द्रीय मंत्री व राज्यसभा खासदार (मृत्यू: ३ मे २००६)
१९५१ : भारतीय ड्रमर आणि गीतकार त्रिलोक गुर्टू यांचा जन्म.
१९६० : डिएगो मॅराडोना अर्जेंटिनाचा फूटबॉलपटू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८३ : भारतीय तत्त्वज्ञ आणि विद्वान दयानंद सरस्वती यांचे निधन. (जन्म: १२ फेब्रुवारी १८२४)
१९७४ : बेगम अख्तर गझल, दादरा आणि ठुमरी गायिका. गझल गायकीला त्यांनी प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. (जन्म: ७ आक्टोबर १९१४)
१९८४ : प्रसिद्ध चित्रपट निर्माता, लेखक, दिग्दर्शक आणि संगीतकार ख्वाजा खुर्शीद अन्वर यांचे निधन.
१९९० : व्ही. शांताराम चित्रपटनिर्माते, दिग्दर्शक आणि अभिनेते, पद्मश्री, दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते (जन्म: १८ नोव्हेंबर १९०१)
१९९० : विनोद मेहरा अभिनेता (जन्म: १३ फेब्रुवारी १९४५)
१९९४ : सरदार स्वर्ण सिंग केन्द्रीय मंत्री (जन्म: १९ ऑगस्ट १९०७)
१९९६ : प्रभाकर नारायण ऊर्फ 'भाऊ' पाध्ये लेखक, पत्रकार व कामगार संघटनेचे कार्यकर्ते (जन्म: २९ नोव्हेंबर १९२६)
१९९८ : विश्राम बेडेकर लेखक व दिग्दर्शक (जन्म: १३ ऑगस्ट १९०६)
२००५ : भारतीय राजकारणी शम्मीशेर सिंह शेरी यांचे निधन.
२०११ : अरविंद मफतलाल उद्योगपती (जन्म: २७ आक्टोबर १९२३)
२०१४ : सुप्रसिद्ध भारतीय साहित्यकार रॉबिन शॉ यांचे निधन.

# उसावर दिसतोय पोक्का बोंग, तांबेराचा प्रादुर्भाव

प्रतिकूल हवामानामध्ये सध्याच्या काळात ऊस पिकामध्ये पोक्का बोंग, तांबेरा, गवताळ वाढ आणि यलो लिफ डिसीज या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. या रोगांची लक्षणे तपासून तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

पोक्का बोंग : १) बुरशीचा प्रादुर्भाव झाल्यावर सुरुवातीला तिसऱ्या, चौथ्या पानांच्या बेचक्यात पांढरट, पिवळसर पट्टे दिसतात. रोगाचा प्राथमिक प्रसार हवा, पाण्याद्वारे होतो. २) सुरकुत्या पडून पाने आकसतात, लांबी घटते. तीव्रता वाढल्यास पाने सडतात. गळून पडतात किंवा एकमेकांत गुरफटतात. ३) कांड्यांवर कांडी काप (नाइफ कट) सारखी लक्षणे दिसून येतात. नियंत्रणाचे उपाय : माती परीक्षणानुसार योग्य प्रमाणात रासायनिक खतांची मात्रा द्यावी. शेंडेकुज झालेले, पांगशा फुटलेले ऊस शेतातून वेगळे काढून जाळून नष्ट करावेत.

बुरशीनाशक फवारणी : (प्रति लिटर पाणी) - २ ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोराइड किंवा
- १ ग्रॅम कार्बेन्डाझिम किंवा
- ३ ग्रॅम मॅम्कोझेब

टीप : १० दिवसांच्या अंतराने २ ते ३ फवारण्या कराव्यात.



तपकिरी तांबेरा : वाढती आर्द्रता आणि तापमान रोगकारक बुरशीची वाढ आणि प्रसारासाठी पोषक असते. सुरुवातीस लहान व लांबट पिवळे ठिपके पानाच्या खालच्या बाजूस दिसून येतात. कालांतराने ठिपक्यांची लांबी वाढते. त्यांचा रंग लालसर तपकिरी किंवा तपकिरी दिसून येतो. ठिपक्यांचा भाग बुरशी आणि बीजाणूंच्या वाढीमुळे फुगीर होतो. त्यामुळे पानांचा ठिपक्यालगत भाग फुटून त्यातून नारिंगी किंवा तांबूस-तपकिरी रंगाचे बीजाणू बाहेर पडतात.

रोगाचा प्रादुर्भाव आणि प्रसार पावसाळ्यानंतर ढगाळ वातावरण, जास्त आर्द्रता व थंड हवा असताना जास्त प्रमाणात दिसून येतो. रोगाचा प्रसार हवा, पाण्याद्वारे होतो.

नियंत्रणाचे उपाय : रोगाचा प्रादुर्भाव असणाऱ्या भागात मध्यम कोव्हीएसआय ०३१०२, व्हीएसआय ०८००५ या रोग प्रतिकारक जातींची लागवड करावी.

खतांची मात्रा माती परीक्षणानुसार योग्य वेळी द्यावी. नत्रयुक्त खते तसेच इतर खतांची मात्रा उशिरा देऊ नये. पावसाळ्यात शेतातून अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.

बुरशीनाशकाची फवारणी : (प्रति लिटर पाणी)
- प्रोपिनेब २.५ ग्रॅम किंवा
- मॅम्कोझेब ३ ग्रॅम

टीप : १० दिवसांच्या अंतराने २ ते ३ फवारण्या कराव्यात. रोगाचा जास्त प्रादुर्भाव असेल तर फवारणीपूर्वी रोगग्रस्त आणि वाळलेली पाने शेताबाहेर काढावीत.

गवताळ वाढ : दूषित बेणे आणि मावा, तुडतुडे किडीद्वारे प्रसार होतो. सुरुवातीच्या काळात बेटात प्रमाणापेक्षा जास्त फुटवे दिसतात. बेटास गवताच्या ठोंबाचे स्वरूप येते. पानांमध्ये हरितद्रव्य कमी प्रमाणात तयार होते. पाने पिवळी, पांढरी पडतात. पाने अरुंद व आखूड होतात. पूर्ण वाढ झालेल्या उसामध्ये पोंग्यातील पाने पिवळी पडतात. कांड्यावरील डोळ्यातून पिवळसर पांगशा फुटतात. रोगट ऊस पोकळ पडून वाळतो. खोडवा पिकात रोगाचे प्रमाण सुरुवातीच्या काळात जास्त आढळते.

नियंत्रणाचे उपाय : रोगमुक्त बेणे लागणीसाठी निवडावे. १०० ग्रॅम कार्बेन्डाझिम १०० लिटर पाण्यात मिसळावे. या द्रावणात बेणे १५ मिनिटे बुडवून त्यानंतर लागवडीसाठी वापरावे. पिकाची पाहणी करून रोगट बेटे काढून जाळून नष्ट करावीत. रोगाचा प्रसार करणाऱ्या मावा, तुडतुडे या किडींच्या नियंत्रणासाठी ०.३ मिलि इमिडाक्लोप्रीड प्रति लिटर पाण्यात मिसळून १० दिवसांच्या अंतराने २ ते ३ फवारण्या कराव्यात.

येलो लिफ डिसीज : हा विषाणूजन्य रोग आहे. बेण्याद्वारे देखील हा रोग पसरतो. खोडवा पिकात जास्त प्रमाण आढळते. ७ ते ८ महिन्यांच्या पिकांमध्ये सुरुवातीस पानाची मध्यशीर खालच्या बाजूने पिवळी पडते. प्रथम ३ ते ६ क्रमांकाच्या पानांवर लक्षणे दिसतात. कालांतराने पिवळेपणा मध्यशिरेपासून बाजूस वाढत जाऊन पूर्ण पान पिवळे पडते. हळूहळू उसाची सर्व पाने पिवळी पडतात. शेंड्याकडून पाने वाळत जातात. काही वेळेस रोगग्रस्त पाने शिरेलगत लालसर दिसतात. किडींचा प्रादुर्भाव, अतिथंडी तसेच अन्नद्रव्यांच्या ताणामुळे रोगाची तीव्रता दिसते.

नियंत्रणाचे उपाय : बेणे बदलासाठी तीन स्तरीय बेणेमळा करावा. पायाभूत बेणेमळ्यासाठी जास्तीत जास्त उतिसंवर्धित रोपांचा वापर करावा. पीक ताणग्रस्त राहणार नाही याची काळजी घ्यावी. रोगाचा प्रसार करणाऱ्या मावा, तुडतुडे, पांढरी माशी या किडींच्या नियंत्रणासाठी ०.३ मिलि इमिडाक्लोप्रीड प्रति लिटर पाण्यात मिसळून १० दिवसांच्या अंतराने २ ते ३ फवारण्या कराव्यात.

# आयुष डॉक्टरांनो आपापल्या पॅथी मध्ये टॉप करा -डॉ.अशोक थोरात

## जिल्हा रुग्णालय येथे धन्वंतरी जयंती व राष्ट्रीय आयुर्वेद दिन उत्साहात साजरा

बीड। प्रतिनिधी

जिल्हा रुग्णालयातील आयुष कक्ष येथे दिनांक २९ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी अकरा वाजता धन्वंतरी जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. अशोक थोरात, जिल्हा शल्यचिकित्सक, बीड हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. गणेश राऊत यांनी हजेरी लावली. कार्यक्रमात डॉ. एल. आर. तांदळे, डॉ. पुरुषोत्तम पिंगळे (जिल्हा आयुष अधिकारी), डॉ. अजय राख (आयुष कन्सल्टंट), आणि डॉ. सचिन एस. वारे (आयुष प्रमुख, जिल्हा रुग्णालय, बीड) यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात धन्वंतरी पूजन, स्तवन आणि दीप प्रज्वलनाने करण्यात आली. अध्यक्षांची सत्कार आणि स्वागत समारंभ पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सचिन वारे यांनी केले, तर प्रस्तावना डॉ. दुर्गेश जोशी यांनी केली. त्यांनी आयुर्वेदाचे महत्त्व आणि माहिती दिली, तर डॉ. वैशाली वारे यांनी आयुष विभागाची आज पेरेंत आयुष विभागाची माहिती सादर केली. आयुर्वेदातील संशोधन कार्य आणि उपचार पद्धतींवर डॉ. स्नेहल आंधळकर यांनी मार्गदर्शन केले.प्रमुख




पाहुणे डॉ. गणेश राऊत यांनी आयुर्वेदाबद्दलचे विचार व्यक्त केले आणि कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप डॉ. अशोक थोरात यांनी केले. आपल्या समारोपात, डॉ. थोरात यांनी जागतिक आयुर्वेदिक दिनाच्या शुभेच्छा देऊन सर्व आयुष डॉक्टरांनी आपापल्या चिकित्सा पद्धती मध्ये उत्तम कार्य करावे, असा सल्ला दिला. तसेच, त्यांनी दिवाळीच्या शुभेच्छा देखील दिल्या आणि आयुषच्या उपचार पद्धतींचे महत्त्व अधोरेखित केले. व सर्व आयुष डॉक्टरांना सूचना दिल्या टिकून राहायचे असेल तर आपापल्या पॅथी मध्ये टॉप करा कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. अजय राख यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. सचिन वारे आणि आयुष विभागाचा सर्व स्टाफ आणि वैद्यकीय अधिकारी, तसेच डॉ. हलीमा सय्यद डॉ. सबाहत फातिमा, डॉ. साजिया शेख, डॉ. आनंद कुलकर्णी, श्री. गव्हाणे (फार्मासिस्ट), श्री. लिमकर (योग प्रशिक्षक), आणि आकाश वाघमारे यांनी केले.

## किल्ले महादुर्गात धारूर येथे जागर प्रतिष्ठानचा दीपोत्सव साजरा



धारूर। प्रतिनिधी

धारूर येथील ऐतीहासीक महादुर्गावर जागर प्रतिष्ठाणचे वतीने सलग पाचव्या वर्षि दिपावलीचा पहीला दिवा छत्रपती शिवाजी चे पावनभुमीत लावूनदिपोत्सव साजरा करण्यात आला सर्व ऐतीहासीट किल्ला दिव्याचे झगमगाटाने लखलखून गेला होता.

या उपक्रमाचे सर्वत्र कौतूक होत आहेबीड जिल्ह्यातील ऐतिहासिक वारसा असलेल्या धारूर येथील महादुर्ग गडावर जागर प्रतिष्ठान च्या वतीने भव्य दिव्य असा दीपोत्सव साजरा करण्यात आला ,गेल्या चार वर्षांपासून जागर प्रतिष्ठान या ठिकाणी दिपोतस्व साजरा करत आहे.५००० दिव्यांचा आणि मशालीच्या प्रकाशाने गड उजलुन निघाला होता पोवाडे व शिवगीतांनी वातावरण अत्यंत शिवमय झाले होते जागर प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष किसन पाटील चव्हाण यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले ,कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून आयुष्यमान भारत चे अध्यक्ष ओमप्रकाश शेटे , शौर्य प्रतिष्ठान चे अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील,नारायण डक,राम शेठ राठोड,स्वराज्य पक्षाचे राज्य कार्यकारणी सदस्य चंद्रशेखर दादा कदम , सूरज जयभाये, स्वप्नील वरपे, सुरेश गवळी, मोहन भोसले, बालाजी चव्हाण, विजय निर्मळ बंडू खांडेकर आदी मान्यवर उपस्थित होते तसेच जागर प्रतिष्ठान च्या सर्वच शिलेदारांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रचंड कष्ट घेतले सोहळ्यासाठी जागर प्रतिष्ठान चे एक हजार हून अधिक शिलेदार उपस्थित होते

# दफ्तराचे ओझे टेकवून विद्यार्थांनी बांधली कमरेला ओटी

## दिवाळीच्या सुट्टीत विद्यार्थांचा पालकांना कापूस वेचणीसाठी हातभार



### दहा ते तेरा रुपये प्रतिकिलो वेचणीला भाव

कापूस वेचणीला मजूर मिळत नसल्याने शेतकऱ्याला दहा ते तेरा रुपये प्रती किलो भाव वेचणीला द्यावा लागत आहे. शेतकऱ्यांना ही बाब जरी परवडणारी नसली तरी शेतातील होणारे नुकसान पाहून हा कडवट निर्णय घ्यावा लागत आहे.

**शंकर भालेकर**

**शिरूर :** शालेय विद्यार्थ्यांना दिवाळीची सुट्टी आणि शेतकऱ्यांची कापूस वेचणीची लगबग दरवर्षी अगदी हे गणित जुळूनच येत. ऑक्टोबरच्या कडक्याच्या उन्हानं कापसाची बोंडे फुटून येतात. आणि हिरवेगार कापसाचे शेत पांढरे शुभ्र होऊन जाते. तशी शेतकऱ्याच्या मनामध्ये धस्की निर्माण होते.कापूस वेचणीसाठी मजूर मिळेने कठीण होते. मिळालेले मजूर शेताच्या बांदावर येई पर्यंत भरवसादेता येत नाही. कारण मध्येच एखादा शेतकरी जास्तीच्या पैशाची फूस लावून मजूर पळवतो.अल्प भूधारक शेतकरी आपल्या शेतातील कापूस वेचणीला प्राधान्य देतात या मुळे निश्चितच बहूभूधारक शेतकऱ्यांच्या कापूस वेचणीला हेळसांड होत असते.अशा परिस्थितीमध्ये दिवाळी तोंडावर येते तर कधी -कधी परतीच्या पावसाचाही कापसाच्या पिकाला धोका होतो.यामुळे शेतकऱ्यांची कापूस वेचणीसाठी शेतकऱ्यांची त्रेद्धातिरपीट उडत असते. हे वर्ष या गोष्टीला अपवाद नाही. शेतकऱ्यांची उडलेलेली तारांबळ पाहून विद्यार्थ्यांनाच कीव येते. दिवाळीची सुट्टी लागताच शालेय विद्यार्थ्यांनी पाठीवरचे दफ्ताराचे ओझे टेकून आई -वडिलांच्या मदतीसाठी कापूस वेचायला कंबरेला ओटी बांधली आहे. शनिवार दि. २६ ऑक्टोबर रोजी प्रथमसत्र परीक्षेचा शेवटचा दिल्यानंतर रविवारी अगदी सकाळीच कापूस वेचणीला धाव घेतली आहे.यातून कापूस वेचणीला तर हात भार तर लागेलच परंतु कापूस वेचणीचा मुबलक पैसा मिल्यावर अनेक कुटुंबाची दिवाळी गोड होत होणार आहे .

# भारतीय संस्कृतीत गोमातेला अनन्यसाधारण महत्त्व- मस्के

## कै. तुकाराम गुरुजी गो शाळेत वसू बारस साजरी

बीड। प्रतिनिधी

आज गोवत्स द्वादशी अर्थात वसू बारस. आजपासून दिवाळी सुरू होते. भारतीय संस्कृतीत गाईला मातेचे स्थान असून, कृतज्ञतेच्या भावनेतून गाय आणि वासरू यांची पूजा केली जाते. प्रेम आणि वातसल्याचे प्रतीक वसू बारस निमित्ताने शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी मित्र, परिवारासह कै. तुकाराम गुरुजी गोशाळेत गाय वासरांचे विधिवत पूजन,व गायींना गोग्रास देऊन, वसू बारस उत्साहात साजरी केली.

गोमातेला हिंदुस्थानात अनन्यसाधारन महत्त्व आहे. नुकताच राज्यात सरकारने कॅबिनेटच्या बैठकीत देशी गायींना राज्य मातेचा दर्जा देण्यात आला आहे. ही आनंदाची बाब आहे. गोमाता सात्त्विक असल्याने सर्वांनी या पूजनाद्वारे तिच्या सात्त्विक गुणांचा स्वीकार करावा, असे



म्हटले जाते. सत्त्वगुणी, म्हणजेच आपल्या सहवासाने दुसर्याला पावन करणार्या, आपल्या दुधाने समाजाला बलिष्ठ करणार्या, आपले अंग-प्रत्यंग अर्पण करून समाजाला उपयोगी पडणार्या, शेतीला आपल्या शेणाद्वारे खत देऊन पौष्टिकत्व आणणार्या, शेतीला उपयुक्त अशा बैलांना जन्म देणार्या गोमातेचे या दिवशी पूजन करतात. ज्या ठिकाणी गोमातेचे संरक्षण, संवर्धन होऊन तिला पूज्यभाव देऊन तिचे पूजन होते, त्या ठिकाणी ती व्यक्ती, तो समाज, ते राष्ट्र भरभराटीस आल्याशिवाय राहत नाही, असे सांगितले जाते. अशा गोमातेचे प्रथम तिच्या वत्सासहित पूजन करून दीपोत्सवाला सुरुवात होते. गोमातेचे जीवन खऱ्या अर्थाने परोपकारी असून, तिच्या अस्तित्वामुळे मानवी जीवनाला समृद्धी लाभते. म्हणून भारतीय संस्कृतीत गोमातेला अनन्यसाधारण महत्त्व आहे.अशी प्रतिक्रिया शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी यावेळी दिली.

# राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने मुक्तीराम आबुज यांनी दाखल केला उमेदवारी अर्ज

माजलगाव । प्रतिनिधी

राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर यांनी महाराष्ट्रात २८८ विधानसभा मतदारसंघात पक्षाच्या वतीने उमेदवार देणार असल्याचे नमूद केले होते.त्या अनुषंगाने माजलगाव विधानसभा मतदारसंघात राष्ट्रीय समाज पक्षाचे तालुकाध्यक्ष मुक्तीराम आबुज यांनी शेवटच्या दिवशी दि २९ ऑक्टोबर मंगळवार रोजी उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल केला आहे.

माजलगाव विधानसभेसाठी राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर यांच्या आदेशानुसार माजलगाव विधानसभेसाठी राष्ट्रीय समाज



पक्षाचे तालुकाध्यक्ष मुक्तीराम आबुज यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे दि २९ ऑक्टोबर मंगळवार रोजी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष कपिल गाडेकर, विधानसभा अध्यक्ष हारीभाऊ कांडुरे,युवक जिल्हाध्यक्ष बालाजी काळे, संपर्क प्रमुख दत्ता सातपुते,वडवणी तालुकाध्यक्ष परमेश्वर शिंदे, वडवणी संपर्क प्रमुख अतुल कानाडे यांच्यासह माजलगाव,धारुर व वडवणी तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# हायवा बेभान चालू लागले

## कर्मचाऱ्यांनी लक्ष देवून काम करावे-डॉ.तांदळे

बीड। प्रतिनिधी

शहरात सध्या नगर रस्त्याचे काम साकेत कंपनी मार्फत चालू असून ट्राफिक एका बाजूनेच होत आहे अशातच कसलेही नियोजन नसल्याने दि.२८ ऑक्टोबर सोमवार रोजी सायंकाळी ४ च्या दरम्यान नगर नाक्यावर साकेत कंपनीच्या हायवाचे पुढील डाव्या बाजुचे डायर फुटल्याने बालाजी स्वीट होम शेजारी ब्युटी सलुन समोर विठ्ठल घोडके (वय ५२ वर्षे) हे मित्रांसमवेत उभे असतांना पुढील डाव्या बाजुचे डायर फुटल्याने एक दगड वेगात विठ्ठल घोडके यांच्या डाव्या छातीला चाटून शेजारील ब्युटी सलूनच्या काचेवर आदळून काच फुटली व विठ्ठल घोडके गंभीर जखमी झाले त्यांना उपचारासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.संजय तांदळे व मित्र परिवाराने चिंतामणी हॉस्पीटलमध्ये दाखल केले त्यांच्यावर डॉ.नितीन रायमाळे उपचार केले.दरम्यान नगर रस्त्याच्या एका बाजूनेच वाहने जात असून चुकीच्या बाजूच्या चालणार्या वाहनांवर पोलीस प्रशासनाने देखील दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे छोटे-मोठे अपघात झालेले आहेत साकेत कंपनीच्या कर्मचार्यांनी देखील स्वतःच्या वाहनांपासून नागरिकांना काही धोका निर्माण होवू नये म्हणून पुढाकार घेवून कटाक्षतेने काम करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.संजय तांदळे यांनी केली आहे.

# ब्रह्मतेज स्त्री संघाकडून रांगोळी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड। प्रतिनिधी

दिवाळीचे औचित्य साधून बीड येथील ब्रह्मतेज स्त्री संघाकडून हस्तकलावस्तू प्रदर्शन विक्री आणि विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जनजागृती व्हावी व मतदारांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून सौ. सुरभि खोपटीकर यांच्या संकल्पनेतून 'मतदान जागृती अभियान ' या विषयावर सुभाष रोडवरील अमृत मंगल कार्यालयात विद्यार्थीनींसाठी रविवारी (दि.२७) रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या रांगोळी स्पर्धेला विद्यार्थिनींचा मोठा प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा स्वीप नोडल अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून उषा जोशी, डॉ.सीमा जोशी,सौ.वृंदा देशमुख, सौ.प्रणिता गंगाखेडकर, सौ. नहार यांची उपस्थिती होती. ब्रह्मतेज स्त्री संघाकडून नवरात्रोत्सवात नऊ दिवस ऑनलाइन व्याख्यानमालेचा उपक्रमही राबवण्यात आला होता. त्या ऑनलाइन कार्यक्रमाचे संचलन सौ.जागृती खडकीकर(औटी) यांनी केले. त्यावेळी सौ.कामाक्षी जोशी, सौ.प्रणिता गंगाखेडकर, सौ.साक्षी खडकीकर, सौ.डॉ.आश्विनी किन्हीकर, सौ.सुमती पिंगळे, सौ.ऋतुजा






रामदासी, सौ.सुषमा भट, श्रीमती रत्ना हसेगावकर, कु. भक्ती जातेगावकर, सौ.अपर्णा कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले होते. याप्रसंगी त्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ब्रह्मतेज स्त्री संघाच्या वतीने मतदान जागृती अभियान विषयावर रांगोळी स्पर्धेमध्ये बीड येथील कु.ज्योती दीपक सर्वज्ञ ही सर्वप्रथम आली. तिने मतदान जागृतीसंबंधी प्रबोधनात्मक रांगोळी साकारली. तर सौ.पूजा शुभम जोशी हिचा रांगोळी स्पर्धेत द्वितीय क्रमांक आला. कु.राधिका विनायक वझे तृतीय आली. लहान गटांसाठीच्या रांगोळी स्पर्धेत कु.दीप्ती विकास महाजन सर्वप्रथम, कु.अक्षरा गजानन साळुंखे द्वितीय, कु.वृंदा ज्ञानेश्वर केटे ही तृतीय तर कु.ऋतुजा जालिंदर काळे उत्तेजनार्थ ठरली. या सर्व विद्यार्थीनींचा मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देवून सत्कार करण्यात आले .रांगोळी स्पर्धेचे परीक्षण संस्कार भारती बीड चे जिल्हाध्यक्ष प्रमोद वझे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.सुरभी खोपटीकर-पाचेगावकर यांनी केले. स्वतः तयार केलेल्या वस्तू, छोटे-मोठे व्यवसायिक यांना स्वतःच्या वस्तू च्या प्रचारासाठी व विक्रीसाठी एक प्रदर्शनाचे आयोजन केले होते. यामुळे अनेक छोट्या मोठ्या उद्योजकांना प्रोत्साहन मिळाले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी , आयोजक सौ.रोहिणी बाभुळगावकर, सौ.सारिका गोले,सौ.शुभांगी पाठक, सौ.रूपाली सुलाखे,सौ.भक्ती कास्तीकर, मीरा वैद्य, अनिता खडकीकर, कविता देशमुख,संगीता घायाळ आदींसह ब्रह्मतेज स्त्री संघाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्रात भाजप महायुतीची सत्ता येणार-दानवे

## नारायण कुचे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

अंबड। प्रतिनिधी

महाराष्ट्र मध्ये भारतीय जनता पार्टी व मित्र पक्षाची महायुती ची सत्ता येणार आहे असे माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी बदनापूर येथे आमदार नारायण राणे यांचे उमेदवारी अर्ज दाखल करताना आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केली.

पुढे बोलताना म्हणाले की राज्यात लोकसभेत अपेक्षा पेक्षा कमी यश आले हे आम्ही मान्य केली असून आता वातावरण बदलले आहे १८० जागा पेक्षा जास्त येईल परंतु कमी येणार नाही असा ही विश्वास व्यक्त केला आज आणि आज आणि उद्या उमेदवारी भरण्याचा दिवस आहे पक्षश्रेष्ठी बसून काही जागेवर निर्णय घेतील बंडखोरी बद्दल बोलताना ते म्हणाले की चार तारखेनंतर सर्व चित्र स्पष्ट होईल तोपर्यंत बंडखोरी चा विषय नाही भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित दादा पवार गट), आरपीआय (आठवले) मित्र पक्षाचे महायुतीचे लोकप्रिय उमेदवार श्री कुचे नारायण तिलकचंद यांचा उमेदवार अर्ज माजी केंद्रीय रेल्वे मंत्री श्री रावसाहेब पाटील दानवे, भाजपा राष्ट्रीय संघटन सचिव



अरविंदजी मेनन, माजी आ. अरविंद चव्हाण, बद्रीनाथ पठाडे, चंद्रकांत कारके, गणेश बापू फुके, तुकाराम जाधव यांच्या उपस्थितीमध्ये दाखल करण्यात आला, बालाजी मंदिर बदनापूर येथे सभा संपन्न झाली याप्रसंगी , सर्व महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# डॉ.ज्योती मेटे विधानसभेच्या मैदानात

## सर्वसामान्यांच्या डोळ्यात तरळनारे मेटे साहेबांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल -डॉ. ज्योती मेटे

**बीड । प्रतिनिधी**

शिवसंग्राम अध्यक्ष डॉक्टर ज्योती विनायक मेटे यांनी आज शेवटच्या दिवशी शक्ती प्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला यावेळी शिवसंग्रामचे असंख्य कार्यकर्ते पदाधिकारी आणि लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्यावर प्रेम करणारे असंख्य चाहते उपस्थित होते. यावेळी अर्ज दाखल करण्यासाठी उपस्थित असलेले कार्यकर्ते स्वर्गीय विनायकराव मेटे यांच्या आठवणीने भाऊक झाल्याचे पाहायला मिळाले. ''अमर रहे अमर रहे मेटे साहेब अमर रहे''च्या घोषणा देत स्वर्गीय अण्णासाहेब पाटील, विनायकराव मेटे साहेब आणि मनोज जरांगे पाटील यांच्या प्रतिमा





यावेळी कार्यकर्त्यांच्या हातात पहावयास मिळाल्या.

अर्ज दाखल करण्या पूर्वी डॉक्टर ज्योती मेटे यांनी श्रीक्षेत्र नारायण गड, नवगण राजुरीचे गणेश दर्शन आणि लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या स्मृतिस्थळावर अभिवादन केले तसेच बीड शहरातील महापुरुषांना अभिवादन करत शहेशावली दर्ग्याला चादर देखील चढवली आणि उमेदवारी अर्ज दाखल केला. याप्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे सलीम पटेल, ॲड,मंगेश पोकळे, खालील पेंटर, अनिल घुमरे , सुहास पाटील, प्रा.सुभाष जाधव,सुनील शिंदे, नवनाथ प्रभाळे, सुशील कांबळे, कुतुभाई, शेख आबेद , अख्तर पेंटर, प्रशांत डोरले आदी उपस्थित

**विधानसभे करिता आज नामनिर्देशन पत्र दाखल करण्यापूर्वी शिवसंग्राम भवन येथे महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे औक्षण केले याप्रसंगी जिव्हाळा निराधार केंद्रातील एक ज्येष्ठ महिला भगिनी उपस्थित होत्या त्यांनी त्यांचे डॉ. मेटे यांचे औक्षण केले यावेळी त्यांना आपल्या भावना अनावर झाल्या आणि ताई आम्हा निराधारांसाठी आपण पुढे झालं पाहिजे अशी भावना व्यक्त केली**

होते. अर्ज दाखल केल्या नंतर त्यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले या प्रसंगी डॉ.ज्योती मेटे म्हणाल्या की बीडचा इतिहास मी तुम्हाला नव्याने सांगण्याची गरज नाही. बीड पंचायत समिती , जिल्हा परिषद , नगर पालिका यासह आमदारकी , खासदारकी , पालकमंत्री हे सर्व सत्ता केंद्रे क्षीरसागर यांच्या कडेच होती. मग आज ही बीड शहर आणि तालुक्याची दुरवस्था झाली आहे याला जब्बदार कोण ? आणि हे जबाबदार असणारे सर्व चेहरे बाजूला ठेवण्यासाठी आणि सर्वसामान्यांच्या डोळ्यात तरळनारे मेटे साहेबांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आज आपण उमेदवारी अर्ज दाखल केला आहे असे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले.

## निवडणूक निरीक्षक भुवनेश प्रताप सिंग यांचे आगमन

**बीड । प्रतिनिधी**

बीड विधानसभा मतदारसंघा करीता निवडणूक निरीक्षक म्हणून भुवनेश प्रताप सिंग (भा.प्र.से) यांचे आगमन २८ ऑक्टोबर २०२४ रोजी झाले आहे. त्यांचा संपर्क क्रमांक ९२२६७ ७०३३९ व इमेल आयडी ... हा आहे. तसेच ते संपूर्ण निवडणूक कालावधीत शासकीय विश्रामगृह, बीड येथे वास्तव्यास आहेत. निवडणूक विषयक तक्रार अथवा माहिती कळविण्यासाठी वरील तपशीलवार क्रमांकावर संपर्क साधावा, असे बीड विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव यांनी कळविले आहे.




## डि. जी. मळेकर यांचा बीड विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

**खालापुरी । प्रतिनिधी**

राज्याच्या बांधकाम विभागाचे सेवानिवृत्त अभियंता शिरूर कासार तालुक्यातील आर्वी गावचे भूमिपुत्र डी जी मळेकर यांनी बीड २३० विधानसभा मतदारसंघातून मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार काल २९ ऑक्टोबर मंगळवार रोजी अपक्ष म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

डी जी मुळेकर हे एक होतकरू नेतृत्व असून सर्वसामान्यांच्या प्रश्नासाठी अहोरात्र झटणारे आहे उच्चशिक्षित असलेल्या या नेतृत्वाला प्रशासनाचा दांडगा अनुभव असल्यामुळे मतदार संघातील विविध विकास योजना खेचून आणण्यासाठी कामी येणार असून मराठा मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशानुसार त्यांनी बीड विधानसभेतून आपला अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केलेला आहे त्यांच्या या निर्णयाचे संपूर्ण शिरूर कासार तालुक्यात व बीड मतदार संघात स्वागत होत आहे .

## सतीश घाटगेंची अखेर बंडखोरी ; केला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

### उमेदवारी अर्ज भरण्यासाठी घनसावंगीत उसळला जनसागर

घनसावंगी । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीत सतीश घाटगे यांनी विशाल असे शक्ती प्रदर्शन करत जनतेच्या मनातला उमेदवार म्हणून शेवटच्या दिवशी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी घनसावंगी विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील गावागावातून आणि खेड्या-पाड्यातून सर्वसामान्य जनता शेतकरी, कष्टकरी आणि युवक हजारोच्या संख्येने एकवटले होते. हजारो जनतेसमोर नतमस्तक होत ,मी बंडखोरी केली नसून जनतेसाठी उठाव केला आहे. अशी भूमिका मांडत निवडणुकीतून माघार घेणार नसल्याचं स्पष्ट भूमिका घाटगे यांनी घेतली आहे.

माझी निवडणूक जनतेसाठी




आहे. आणि जनता या लढाईत विजयी होणार..असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

घनसावंगी विधानसभेसाठी महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात जागेसाठी मोठी रस्सीखेच झाली. उमेदवारी अर्ज भरण्याच्या एक दिवस अगोदर घनसावंगी विधानसभेच्या जागेचा पेच सुटला. शिवसेना शिंदे गटाला ही जागा सुटली. मंगळवारी हिकमत उढान यांनी शिवसेनेकडून उमेदवारी अर्ज भरला. तर सतीश घाटगे यांनी जनतेसाठी निवडणुकीच्या मैदानात उतरत असल्याची घोषणा करत हजारो जनसमुदायांच्या उपस्थितीत शक्ती प्रदर्शन करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला.

जालना अंबड आणि घनसावंगीला दिला शब्द

घनसावंगी विधानसभा मतदारसंघात ◀◀ पान ३ वर

### सतीश घाटगे यांनी पुन्हा मोडला गर्दीचा रेकॉर्ड

**उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सर्वच पक्षाच्या उमेदवारांनी मोठे शक्ती प्रदर्शन करण्याचा प्रयत्न केला. प्रमुख पक्ष्यांच्या उमेदवाराला देखील एवढा प्रतिसाद मिळाला नाही, तेवढा प्रतिसाद सतीश घाटगे यांना सर्वसामान्य जनतेचा मिळाला. नामांकन सभा व रॅलीसाठी घनसावंगी विधानसभा मतदारसंघातून हजारोची जनसंख्या उपस्थित होती. भारतीय जनता पार्टीचे बोटावर मोजण्याइतके पदाधिकारी सोडता सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकारी सतीश घाटगे यांच्यासोबत खंबीर उभे असल्याचे या सभेत दिसले.**

## वंचित बहुजन आघाडी कडून बीड विधानसभेसाठी पुरुषोत्तम वीर यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**बीड । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडी कडून आज शेवटच्या दिवशी बीड येथील तडुन तडफदार युवा नेतृत्व तथा बीड जिल्हा उपाध्यक्ष पुरुषोत्तम उर्फ गोटू वीर यांना अधिकृत उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर व राज्याच्या प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर यांच्या आदेशाने आज बीड विधानसभा मतदार संघातील वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून पुरुषोत्तम उर्फ गोटू वीर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.गत पंचवार्षिक निवडणुकीमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारा मुळे विद्यमान मंत्री जयदत्त क्षीरसागर



यांना मोठा फटका बसला होता. त्या निवडणूक मध्ये ते पराभूत झाले होते. वंचित बहुजन आघाडीचा मतदार हा संपूर्ण बहुजन समाजात व कट्टर आंबेडकरवादी असून त्यामुळे राज्यसह देशाच्या राजकारणात मोठी उलथापाल करण्याची क्षमता वंचित बहुजन आघाडीकडे आहे. वंचित बहुजन आघाडीच्या बीड येथील उमेदवारीने प्रस्थापित उमेदवारांचे धाबे निश्चितपणे दणाणले जाणार आहे. वंचित बहुजन आघाडी ज्या पद्धतीने बीड सह राज्यात राजकारण करत आहे. त्यामुळे महाराष्ट्रात येणारी सत्ता ही त्रिशंकू असेल असे सध्या तरी चित्र दिसत आहे. वंचित बहुजन आघाडीला कमी लेखून प्रस्थापित राजकीय पक्षांनी आपल्या पायावर धोंडा मारून घेऊ नये असेच चित्र बीड

◀◀ पान ३ वर

## तुम्हीच म्हणाले ना सुट्टा खेळू आता मी पण घड्याळ आणलयं बघू कुणात किती दम आहे

### आ.आजबे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चा एबी फॉर्म आणून एकच खळबळ उडवून दिली

आष्टी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये सर्वाधिक हाय व्होल्टेज समजल्या जाणाऱ्या आष्टी विधानसभा मतदारसंघात गतवर्षी चांगलीच रंगत येत असून आता सुरेश धस हे महायुतीचे कमळ या चिन्हावर निवडणूक लढवणार आहेत तर बाळासाहेब आजबेंनी देखील अजित दादा पवार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चा एबी फॉर्म आणून या निवडणुकीत एक वेगळीच रंगत आणली आहे.

आपण पाच वर्षाच्या काळात काहीच विकास कामे केले नाही अशी सुरेश धस यांनी काल सभेत वल्गना केली .






त्याला प्रत्युत्तर देताना गेल्या पाच वर्षात आपण मतदारसंघातील साडेतीन हजार कोटीचे विकास कामे केले आहे पण हे विकास कामे आडवाआडवी करणाऱ्याला दिसतील तरी कशी अरे या मतदारसंघात तुम्ही कमळचे चिन्ह आणले तर मी बी काय कमी नाही हा बाळासाहेब आजबे पण राजकारणात लिचापेचा नाही आता निवडणुकीत होऊन जाऊ दे तुझे कमळ तर माझे घड्याळ असे जाहीर सभेत आमदार आजबे यांनी घड्याळाचा बी फॉर्म मिळाल्या असल्याची जाहीर करत आमदार सुरेश धस यांच्यावर जाहीर सभेत हल्ला चढविला.

आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात उमेदवार २९ रोजी भरल्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या सदस्य बोलत होते यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी जिल्हा प्रसिद्ध शहर दादा कोंडके यांच्या सह शिवाजीनाकडे भाऊसाहेब गटपाडी धैर्यशील थोरवे नवनाथ सानप विठ्ठल नागरगोजे शेंडगे विश्वास नागरगोजे दीपक ◀◀ पान ३ वर

## लाडकी बहीण योजना बंद करण्यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्याकडून हायकोर्टात याचिका -लोणीकर

**जालना । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी लोकसभा निवडणुकीदरम्यान अनेक खोट्या नाट्य गोष्टी सांगून देशात सह महाराष्ट्रातील जनतेची दिशाभूल केली व त्या माध्यमातून लोकसभेला अनेक ठिकाणी महायुतीच्या उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला त्यामध्ये भाजपा सत्तेत आली तर आरक्षण संपवून टाकेल आणि राज्यघटना बदलून टाकतील अशा चुकीच्या गोष्टी प्रामुख्याने सांगण्यात आल्या परंतु त्यांचे नेते देशाबाहेर गेल्यानंतर आम्ही सत्तेत आलो तर आरक्षण संपवू असं बोलतात त्यामुळे महाविकास आघाडीचे नेते खोट्या गोष्टींचा अपप्रचार करतील त्यांना बळी न पडता परतुर विधानसभा मतदारसंघाचा कायापालट करणाऱ्या माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांना प्रचंड बहुमताने विजयी करा असे आवाहन राज्याचे वन व सांस्कृतिक आणि मत्स्य व्यवसाय मंत्री श्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज केले



परतुर येथे आज आमदार बबनराव लोणीकर यांच्या नामांकन अर्ज भरण्यानिमित्त आयोजित महा विराट रॅली च्या समारोपप्रसंगी श्री सुधीर मुनगंटीवार बोलत होते यावेळी मंचावर भाजपा शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस रिपाई आठवले गट रयत क्रांती संघटना व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार श्री बबनराव लोणीकर माजी आमदार श्री विलासराव खरात भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव श्री राहुल लोणीकर आयुष्यमान भारत योजनेचे महाराष्ट्र राज्य प्रमुख श्री ओमप्रकाश शेटे यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी पुढे बोलताना श्री मुनगंटीवार म्हणाले की कुठल्याही परिस्थितीत कोणताही व्यक्ती देशाची राज्यघटना बदलू शकत नाही परंतु ज्या लोकांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेला राज्यघटनेतील विचारांची पायमल्ली केली तेच लोक आज भारतीय जनता पक्ष आणि महायुतीवर राज्यघटना बदलणार असल्याचा आरोप करत आहेत त्यांना तोडीस तोड उत्तर देत त्यांनी पसरविलेले फेकणारे ठेव हाणून पाडण्याची जबाबदारी प्रत्येक महायुतीच्या कार्यकर्त्यावर असल्याचे देखील यावेळी मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले

देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत आज जगातील महत्त्वाच्या व निर्णय प्रक्रियेतील राष्ट्र बनले आहे संपूर्ण जगाला दिशा देण्याचे काम मोदीजींच्या नेतृत्वात भारत करत आहे अशा परिस्थितीत देशाला अधिकाधिक प्रगतिशील बनवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हात बळकट करण्यासाठी महाराष्ट्र देखील भाजपा महायुतीचे सरकार असणे आवश्यक आहे देशाच्या सर्वांगीण विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सातत्याने प्रयत्न करत असून आपणही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा नेता निवडणे आवश्यक आहे असे यावेळी मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले पुढे बोलताना मुनगंटीवार म्हणाले की बबनराव लोणीकरांच्या माध्यमातून कर्तबगार मंत्री आणि मग मागील पंचवार्षिक मध्ये अनुभवला असून यापुढे देखील पुन्हा एकदा केवळ आमदार नव्हे ◀◀ पान ३ वर

## नितीन जायभाये विधानसभेच्या रिंगणात

बीड । प्रतिनिधी - गेल्या ३० वर्षांपासून सतत संघर्ष व चळवळींची पार्श्वभूमी असलेले, बीड शहरातील नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात लोक-नागरिकांच्या अडीअडचणी समस्या सोडविण्यात नेहमीच अग्रेसर पणे काम करणारे, संघटनात्मक बांधणीचा प्रचंड गाढा अनुभव असलेले, सकल ओबीसी, एस सी./ एस टी; मुस्लिम व सर्वच बहुजन समाजांच्या तळागाळातल्या शेवटच्या घटकाच्या ही अडीअडचणी समस्यांची जाण आणि भान असलेले , फक्त बीड शहरच नव्हे तर समस्त बीड जिल्हा व बीड जिल्ह्याच्या बाहेर ही प्रचंड फार मोठा मित्रपरिवार असलेले, सर्वच लहान थोर आणि सर्व मित्र परिवाराच्या मनावर सुवृत्तीभावाने,प्रेमाने व तळमळीने अधिराज्य करणारे, सर्व जाती धर्मांच्या लोकांना हृदयापासून जपणारे, कुठल्याही भेदभावाच्या विषाचा स्पर्शही न झालेले व सर्वांना सोबत घेऊन चालणारे,



कळवळा असलेले, सर्व मित्र परिवाराला हृदयापासून जपणारे व लोकप्रिय अग्रणी समाजसेवक, सर्वांचे हृदयस्पर्शी, असे बहुआयामी व्यक्तिमत्व श्री नितीनजी जायभाये हे बीड विधानसभेच्या रिंगणात उतरले आहेत. आदरणीय कै. गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या काळातही भगवान सेनेच्या संघटनात्मक बांधणीमध्ये फार मोलाचा व सिंहाचा वाटा उचललेले,अनेक निवडणुकांचा सक्रिय अनुभव असलेले असे नितीनभाऊ सर्वांनाच पूर्वीपासूनच सुपरिचित आहेत. अनेक निवडणुका लढवून, ग्राउंड वर काम करून त्या जिंकण्याचा प्रदीर्घ अनुभव त्यांच्या पाठीशी आहे.नितीनभाऊ हे लोकाभिमुख व कार्यतत्पर व्यक्तिमत्व आहे. सतत लोकसंपर्कात राहणे, लोकांच्या कामांसाठी, समस्या सोडवण्यासाठी पाठपुरावा करत राहणे,तळागाळातील शेवटच्या घटकांची व सर्व स्तरातील लोकांची मदत करत राहणे,लोकांचे गाऱ्हाणे व म्हणणे ऐकून घेणे , त्यांना योग्य तो प्रतिसाद देणे त्यांच्या असलेल्या अडचणी योग्य त्या मार्गाने दुर करणे,अशा संयमशील धोरणाचा अवलंब काम करताना करत असतात.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पर्यावरणपूरक दिवाळी साजरा करा महापालिकेचे पुणेकरांना आवाहन

पुणे । प्रतिनिधी

दिवाळी हा सण अंधार दूर करून प्रकाश निर्माण करणारा दीप मांगल्याचे प्रतिक मानला जातो. हा सण साजरा करताना नागरिकांना हवा प्रदूषण तसेच ध्वनी प्रदूषण यांसारख्या उदभवणाऱ्यासमस्यांना आळा घालण्याकरिता पर्यावरणपूरक पद्धतीने उत्सव साजरा करावा असे आवाहन महापालिकेच्या वतीने पुणेकरांना करण्यात आले आहे.

या आनंदाच्या उत्सवात फटक्यांमुळे होणारे ध्वनी प्रदूषण, हवा प्रदूषण पक्षी आणि आपल्यासाठी हानीकारक असल्याने सर्वांनी हा उत्सव प्रदूषण मुक्त साजरा करावा असे आवाहनही प्रशासनाने केले आहे. फटाके हे वायू प्रदूषणास कारणीभूत ठरतात, तरी शहरातील हवेचे प्रदूषण कमी करण्यासठी प्रत्येक नागरिकांनी फटाक्यांचा वापर करणे टाळावे. हवा प्रदूषणचे प्रमाण जास्त झाल्याने श्वसनाचे आजार होवू शकतात यासाठी जास्त धूर उत्सर्जित करणाऱ्या फटाक्यांचा वापर करणे टाळावे. मोठ्या आवाजाचे फटाके ध्वनी प्रदूषण करतात, अशा फटाक्यांचा वापर करू नये. दिवाळीत १२५ डेसिबलपेक्षा जास्त आवाज करणारे फटाके उडविण्यास मनाई केली आहे, तरी यांसारखे फटाके उडविणे टाळावे. नागरिकांनी शांतता क्षेत्र जसे की शैक्षणिक संस्था, दवाखाने, न्यायालये इ. ठिकाणी फटाके उडवू नये. नागरिकांनी घर सजविण्यासाठी अधिक ऊर्जा कार्यक्षम प्रकाश देणारे एलईडी दिवे किंवा अपारंपारिक ऊर्जा स्रोत जसे की सौर दिवे वापरावेत. रेडिमेड पीओपी पासून बनवलेले किल्ले पर्यावरणास घातक ठरतात त्यांचा वापर न करता दगड मातीपासून किल्ले बनवावेत. रासायनिक रंग, रांगोळी न वापरता नैसर्गिक साहित्यांसह रांगोळी आकर्षक बनवावी. प्लास्टिकचे आकाशकंदील न वापरता पर्यावरणपुरक किंवा रिसायकल करता येणाऱ्या वस्तूंपासून बनलेले आकाशकंदील वापरून पर्यावरणपूरक सजावट करावी.




# पूर्वा वळसे पाटील यांनी घेतल्या घोडेगावला नागरिकांच्या भेटी

मंचर, (प्रतिनिधी) - घोडेगाव (ता. आंबेगाव) येथील आठवडे बाजारातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आंबेगाव विधानसभेचे उमेदवार दिलीप वळसे पाटील यांचा प्रचार करण्यात आला. वळसे पाटील यांच्या कन्या युवा नेत्या पूर्वा वळसे पाटील यांनी बाजारात शेतकरी, व्यापारी व ग्राहक यांच्या भेटी घेतल्या.



यावेळी बाजारातील व्यापारी व शेतकरी यांना वळसे पाटील यांच्या कामांची माहिती पूर्वा वळसे पाटील यांना करून दिली. येथील व्यापारी संघटनेने वळसे पाटील यांच्या मागे उभे राहणार असल्याचे सांगितले. प्रचार फेरीत माजी सभापती कैलासबुवा काळे, भीमाशंकर कारखान्याचे संचालक अक्षय काळे, सोमनाथ काळे, सरपंच अश्विनी तिटकारे, रूपाली झोडगे, क्रांती गाढवे, ज्योती घोडेकर यासह युवक युवतींनी सहभाग घेतला.यावेळी बोलताना पूर्वा वळसे पाटील म्हणाल्या, घोडेगाव हे तालुक्याचे ठिकाण आहे. येथील जुन्या पिढीने कायम वळसे पाटील यांना साथ दिली आहे. घोडेगावात झालेल्या सरकारी इमारती, रस्ते, पाणी, लाईट यासाठी वळसे पाटील यांनी कोट्यावधींचा विकास निधी दिला आहे. यावेळी विक्रमी मतांची आघाडी द्या कारण वळसे पाटील हेच तालुक्याचे वैभव असून विकास पुरुष म्हणजे आदरणीय वळसे पाटील असे समीकरण आंबेगावकरांनी अनुभवले आहे. भाजीपाला व्यापारी संतोष सहाणे म्हणाले, लहान मोठ्या व्यापाऱ्यांना वळसे पाटील यांचा मोठा आधार आहे. येथील बाजारपेठ आता वेगाने वाढत आहे. सर्व प्रकारच्या सुख सुविधा वळसे पाटील यांच्यामुळे उभ्या राहिल्या आहेत.

# कवठे यमाई येथील गावठी दारु हातभट्टीवर शिरुर पोलिसांचा छापा

**शिरूर । प्रतिनिधी**

कवठे येमाई ता.शिरूर येथे रोहिलवाडी परिसरामध्ये गावठी हातभट्टी तयार करणाऱ्या दोन जणांवर गुन्हा दाखल करत शिरूर पोलिसांनी गावठी हातभट्टी रसायनासहीत उध्वस्त केली आहे.



याबाबत शिरुर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांना प्राप्त झालेल्या गोपनिय बातमीच्या आधारे शिरूर पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रातील कवठे येमाई गावच्या हद्दीत रोहीलवाडी, पवार वस्ती ,घोडनदी परीसरातील काटवनात इसम १) अक्षय बाळु देवकर व २) सागर गणपत गंडगुळ दोन्ही रा. कवठेयमाई ता. शिरूर हे मानवी आरोग्यास अपायकारक असणारे गावठी हातभट्टी दारू तयार करण्याचे कच्चे रसायन तापवुन गाळुन त्यापासुन तयार झालेली गावठी हातभट्टीची दारू तसेच ताडी लोकांना पिण्याकरिता विक्री करत असल्याची बातमी मिळाली. सदर ठिकाणी पोलिस निरीक्षक संदेश केंजळे, पो.हवा. भवर, पो.हवा. परशुराम सांगळे, नितिन सुद्रिक, पो. अं. निखिल रावडे, पो.अं. सचिन भोई यांनी छापा कारवाई करून एकूण १,५४,८७५/- रू. किंमतीची गावठी हातभट्टी दारू, कच्चे रसायन, ताडी व गावठी हातभट्टी तयार करण्यासाठी लागणारी आवश्यक साहित्ये जण करून जागीच नष्ट करून छापा कारवाई करून आरोपी १) अक्षय बाळू देवकर व २) सागर गणपत गंडगुळ दोन्ही रा. कवठे येमाई ता. शिरूर यांच्याविरूध्द शिरूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक पंकज देशमुख (भा.पो.से.), मा.अपर पोलीस अधीक्षक पुणे विभाग रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरूर उपविभाग प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर पोलीस स्टेशनचे पो.नि.संदेश केंजळे, पो.हवा. भवर, सांगळे, सुद्रिक, पो.अं.रावडे, पो.अं. सचिन भोई यांनी केलेली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.स.ई दिलीप पवार हे करीत आहेत.

# देहूरोड हद्दीतील अनधिकृत होर्डिंगवर कारवाई

देहूरोड, - देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या हद्दीतील अनधिकृत होर्डिंगवर सोमवारी (दि.२८) अधिकारी, पोलीस व लष्कराच्या बंदोबस्तामध्ये कारवाई करण्यात आली. यात सुमारे सात होर्डिंग काढण्यात आले, तर उर्वरित होर्डिंगवर मंगळवारी कारवाई करण्यात येणार आहे. तसेच काही होर्डिंग मालकांना दोन दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड हद्दीत अनेक इमारतींवर, रस्त्यांच्या बाजूला बेकायदेशीर तसेच अनधिकृत होर्डिंग्ज उभारण्यात आले होते. उच्च न्यायालय आणि जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार बोर्डानी सर्व अनधिकृत होर्डिंग काढण्यासाठी होर्डिंग मालकांना वारंवार नोटिसा व सूचना बजावल्या होत्या. अखेर दोन दिवसांची मुदत देत गुरुवारी (दि.२४) नोटीसा बजावल्या.

नोटीस बजावून देखील होर्डिंग काढण्यात आले नसल्याने सोमवारी बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुष्पांजली रावत यांच्या आदेशानुसार अधिकृत होर्डिंग काढण्याची विशेष मोहीम राबविण्यात आली. पोलीस व लष्कराच्या बंदोबस्तामध्ये बोर्डाचे अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत गॅस वेल्डिंग कटर तसेच क्रेनच्या सहाय्याने होर्डिंग काढण्यात आले.



काही होर्डींग मालकांनी स्वतःहून होर्डींग काढून घेत असल्याचे सांगितल्याने त्यांना दोन दिवसाची मुदत देण्यात आली आहे. मुंबई-पुणे महामार्ग तसेच कात्रज-देहूरोड बाह्यवळण महामार्गावर आणि इमारतींवरील होर्डिंग तसेच होर्डिंगचे लोखंडी सांगाडे काढण्यात आले आहेत

# भरदिवसा बिबट्याचा शेळीवर



पुणे । प्रतिनिधी

वरवंड परीसरात बिबटयाचा उच्छाद थांबता थांबेना. बिबटया मस्तीत अन ग्रामस्थ धास्तीत अशी परीस्थीती निर्माण झाली आहे. याची प्रचिती पुन्हा एकदा आली.कडेठाण रेल्वेस्थानक परीसरात दिवसाढवळ्या मेंढपाळाच्या डोळ्या समोर बिबटयाने शेळीवर झडप घालुन तिला ठार केली.या घटनेने एकच खळबळ उडाली.

मागील साडेतीन महीन्या पासुन येथील पासुडी, परदेशीमळा,शिवणकरवस्ती, जानाइमळा, खाटीकवस्ती आदी बिबटयाचा वावर आहे.बिबटयाच्या हल्ल्यात शेळ्या,मेंढया,कुत्री,वासरे आदी पाळीव प्राण्यांचा मृत्यू झाला. शेतकऱ्यांना जिवावर उधार होवून शेतात जावे लागत आहे.बिबटयाचा उच्छाद पाहता सहायक वनसंरक्षक दिपक पवार,वन्यजिव रक्षक अजित परांजपे,तालुका वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल काळे यांनी घटनास्थळी पाहणी करुन नागरीकांना मार्गदर्शन केले. वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली रेक्युपथका मार्फत परीसरात तब्बल २२ ट्रॅप कॅमेरे लावले.मात्र वनविभागाला अध्यापही बिबटयाचा बंदोबस्त करण्यात यश आले नाही.रात्रभर शेतकरी व रेस्कुपथकाची गस्त सुरु आहे.

# अर्ज भरण्यासाठी निघालेल्या भाजपा उमेदवाराची माघार

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरातील वडगाव शेरी विधानसभा मतदासंघातील अंतर्गत मतभेद मिटवण्यात देवेंद्र फडणवीस यांना शेवटच्याक्षणी यश आलं आहे. वडगाव शेरीमधून विद्यमान आमदार सुनील टिंगरे यांना राष्ट्रवादी काँग्रेसनं उमेदवारी जाहीर केली होती. पण, त्यानंतरही भाजपाने नेते जगदीश मुळीक इथून निवडणूक लढवण्यास ठाम होते. मुळीक यांना भाजपाचा -इ फॉर्म मिळाला होता. त्यानंतर ते मंगळवारी अर्ज भरण्यासाठी निघाले देखील होते. पण, देवेंद्र फडणवीस यांनी शेवटच्या क्षणी फोन करत त्यांची समजूत काढली आहे.




मी वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघातून फॉर्म भरण्यासाठी आलो होतो पक्षाकडून मला एबी फॉर्म देखील देण्यात आला होता.. मात्र प्रक्रिया सुरू असताना माझे नेते देवेंद्र फडणवीस यांचा फोन आला आणि त्यांनी मला सांगितलं की आपल्याला महायुतीचा धर्म पाळायचा आहे फॉर्म भरु नका. मी आता कुठलाही फॉर्म भरणार नाही मला माझ्या नेत्यांनी आश्वासित केला आहे मला न्याय दिला जाईल, असं मुळीक यांनी सांगितलं.

जगदीश मुळीक २०१४ ते १९ या कालावधीमध्ये या मतदारसंघाचे आमदार होते. मागील विधानसभा निवडणुकीत त्यांचा सुनील टिंगरे यांनी पराभव केला. पुण्यातील कल्याणीनगरमध्ये झालेल्या पोर्शे कार अपघातामध्ये टिंगरे यांची भूमिका चांगलीच वादग्रस्त ठरली होती. त्यामुळे त्यांचं तिकीट कापलं जाणार अशीही चर्चा होती, पण राष्ट्रवादी काँग्रेसनं दुसऱ्या यादीत त्यांच्या नावाचा समावेश करत या चर्चेला पूर्णविराम दिला. सुनील टिंगरे यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतरही मुळीक निवडणूक लढवण्यासाठी आग्रही होते. या मतदारसंघात भाजपाचा पाया भक्कम असल्यानं आपल्याला उमेदवारी मिळावी अशी त्यांची आग्रही मागणी होती.

# ज्येष्ठ लेखिका डॉ. वीणा देव यांचे निधन

पुणे : आपल्या लेखणीने मराठी वाचकांच्या मनात वेगळा ठसा उमविणाऱ्या ज्येष्ठ लेखिका डॉ. वीणा विजय देव यांचे मंगळवारी (दि. २९) निधन झाले. वयाच्या ७६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. डॉ. वीणा देव या दिवंगत ज्येष्ठ साहित्यिक गो. नी. दांडेकर यांच्या कन्या व प्रसिद्ध अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या मातोश्री आहेत.



डॉ. वीणा देव यांनी साहित्याचे वेगवेगळे प्रकार हाताळले. पुण्यातील शाहू मंदिर महाविद्यालयात त्यांनी मराठी विभागप्रमुख काम केले. येथे त्यांनी ३२ वर्षे अध्यापनाचे कार्य केले. मराठी कथा-कादंबऱ्यांची नाट्यरूपे या विषयावर सादर केलेल्या प्रबंधासाठी त्यांना पीएच.डीही पदवी मिळाली. लेखन, संकलन आणि संपादन हे साहित्याचे विविध प्रकार त्यांनी लीलया हाताळले, या संदर्भातील त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली. त्यांची अनेक पुस्तके वाचकप्रिय ठरली.

'कधीकधी', 'परतोनी पाहे', 'स्त्रीरंग', 'विभ्रम', 'स्वान्सीचे दिवस' हे त्यांचे लेखसंग्रह गाजले. 'स्मरणे गोनिदांची' हा स्मरणग्रंथ आणि यशवंत देव आणि डॉ. ह. वि. सरदेसाई यांची वीणा देव यांनी संपादित केलेली दोन पुस्तकेही प्रकाशित झाली. डॉ. देव यांनी गो. नी. दांडेकर यांच्यावर लिहिलेल्या 'आशक मस्त फकीर' या व्यक्तिचित्रास राज्य सरकारकडून उत्कृष्ट ललित साहित्य निर्मितीचा पुरस्कार मिळाला. तसेच, सरकारच्या मराठी राजभाषा सल्लागार समितीच्या त्या माजी सदस्य राहिल्या. त्यांना विविध पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांना वीणा मोरया गोसावी जीवनगौरव पुरस्कार तसेच साईरंग प्रतिष्ठानतर्फे कर्तृत्वगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. देव या ठाणे जिल्हा आणि विटा येथील ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा राहिल्या. साहित्य आणि कला क्षेत्रात विविध विषयांवर अनेक ठिकाणी त्यांनी व्याख्याने दिली . मुलाखती घेणे, सूत्रसंचालन याद्वारे त्यांचा आकाशवाणी, दूरदर्शनवर सहभाग राहिला आहे. १९७५ पासून गो. नी. दांडेकर लिखित विविध कादंबऱ्यांच्या अभिवाचनाचे अनेक कार्यक्रम त्यांनी केले. तसेच गो.नी.दा. यांच्या स्मरण-जागरणासाठी डॉ. वीणा देव या पती प्रा. विजय देव यांच्या मदतीने मृण्मयी पुरस्कार, दुर्ग साहित्य संमेलन, गो.नी.दा. यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन असे विविध उपक्रम राबवित. त्यांच्या मृण्मयी प्रकाशनातर्फे त्यांनी गो.नी.दा. यांच्या दुर्मीळ साहित्यकृती प्रकाशित केल्या.

# भव्य रॅली कडून अश्विनी कदम यांनी भरला उमेदवारी अर्ज

**पर्वती । प्रतिनिधी**

विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या उमेदवार अश्विनी कदम यांनीही मोठ्या प्रमाणात शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. रण्येश्वर चौक, पर्वती या ठिकाणावरून भव्य रॅलीचे आयोजन करून निवडणूक प्रचाराचा नारळ फोडला.



या वेळी काँग्रेस पक्षाचे नेते अभय छाजेड, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अंकुश काकडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहराध्यक्ष संजय मोरे, माजी नगरसेवक अशोक हरणावळ यांच्या उपस्थितीत कदम यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मार्केट यार्डमधील पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे आदी महामानवांच्या पुतळ्याला पुष्पहर अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी माजी खासदार वंदना चव्हाण, शिवसेना शहरप्रमुख गजानन थरकुडे, आमदार रवींद्र धंगेकर, भगवान सांळुखे, बाळासाहेब अटल आदी मान्यवर उपस्थित होते. अश्विनी कदम म्हणाल्या, पर्वतीकरांनी आमदार म्हणून सेवा करण्याचे संधी द्यावी. संपूर्ण पुणे शहराला हेवा वाटेल असा पर्वती मतदारसंघ निर्माण करणार आहे.

# कोथरुडमध्ये चंद्रकांत मोकाटे यांचं जोरदार शक्तिप्रदर्शन; उमेदवारी अर्ज केला दाखल

पुणे । प्रतिनिधी

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार चंद्रकांत मोकाटे यांनी आज महाविकास आघाडीतील सर्व नेते पदाधिकारी व कोथरूडकरांच्या समवेत पायी चालत जाऊन अर्ज दाखल केला. छत्रपती श्री शिवाजी महाराज तसेच महर्षी केशव धोंडीबा कर्वे यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून पदयात्रेस सुरवात करण्यात आली. ठिकठिकाणी या पदयात्रेचे नागरिकांनी व पदाधिकाऱ्यांनी उत्स्फूर्त स्वागत केले. तत्पूर्वी छत्रपती श्री शिवाजी महाराज स्मारक चौक येथे महाविकास आघाडीतील सर्व घटकपक्षांच्या नेत्यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत महाविकास आघाडीचे उमेदवार चंदकांत मोकाटेना बहुमताने निवडुन आणण्याचा संकल्प केला. यावेळी बोलताना चंद्रकांत मोकाटे यांनी सर्व महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांचे आभार मानत त्यांच्यावर महाविकास आघाडीने टाकलेला विश्वास सार्थकी लावण्यासाठी कटीबध्द राहील असे आश्वासन सर्वांना दिले. यावेळी शिवसेना पुणे जिल्हा संपर्कप्रमुख सचिन आहिर, वंदना चव्हाण, शहराध्यक्ष अंकुश काकडे, अभय छाजेड, विकासअण्णा पासलकर, लक्ष्मीवाहिनी दुधाणे, स्वातीताई पोकळे, चंदूशेठ कदम, प्रशांत बधे, दामोदर कुंबरे, शिवा मंत्री, योगेश मोकाटे, तानाजी निम्हण, शहरप्रमुख गजानन थरकुडे, संजय मोरे, डॉ.अभिजित मोरे, गोपाळ तिवारी, राजेश पळसकर, विजय खळदकर, स्वप्निल दुधाणे, किशोर कांबळे यांच्या समवेत मोठ्या संख्येने महिला व ज्येष्ठ नागरिक, कोथरूडकर तसेच सर्व महाविकास आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



# रहिवासी भागात बेकायदा फटाका विक्री; पुणे पोलिसांकडून गुन्हे दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

रहिवासी भाग असलेल्या परिसरात बेकायदा फटाका विक्री दुकाने उघडण्यात आल्यानंतर या विक्रेत्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. विमानतळ पोलिसांनी ४ फटका विक्रेत्यांवर गुन्हे दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात चार फटाका विक्रेत्यांवर भारतीय नागरिक संहिता सुरक्षा २०२३ चे कलम ३५ (३) अन्वये पोलिसांनी नोटीस बजावून त्यांच्यावर गुन्हे नोंद केले आहेत.

शहराच्या सर्वच भागात फटाका स्टॉल उभारलेले आहेत. या फटका विक्री दुकानांना अग्निशमन दल, महापालिका, तसेच पोलिसांकडून परवानगी दिली जाते. परवानगी देण्यापूर्वी अटी, शर्तींची पूर्तता देखील दिलेली असते. त्यानंतर त्यांना परवानगी दिले जाते. शहराच्या मध्यभागातील वर्तक बाग, गोळीबार मैदान परिसरात फटाके विक्री दुकाने आहेत. तेथील फटाका विक्रेत्यांना परवाना दिला जाते. दिवाळीची सांगता होईपर्यंत तेथे पुरेशा सुरक्षाविषयक उपाययोजना केल्या जातात. तेथे अग्निशमन दलाचे जवान आणि बंबही ठेवले जातात. मात्र, काही भागात परवानगी न घेता फटाके स्टॉल उभारले जातात. अशांवर कारवाईचा इशारा देण्यात आलेला आहे. दरम्यान, उपनगरातील काही ठिकाणी बेकायदा फटाका विक्री दुकाने उघडल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानूसार, विमानतळ पोलिसांनी कारवाई केली. नगर रस्त्यावरील फिनिक्स मॉलजवळील गल्ली क्रमांक परिसरात सुरू असलेल्या फटाका विक्री दुकानदार, लोहगावमधील संतनगर परिसरातील गुरुराज फटका मार्टच्या मालकावर तसेच संतनगर परिसरातील महालक्ष्मी फटाका मार्ट, तर लोहगावमधील भाजी मंडई परिसरातील एकदंत फटका स्टॉलच्या मालकावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पोलिसांनी तेथील फटका विक्री दुकाने काढून टाकण्याचे आदेश दिले. फटाके जप्त करून पोलीस ठाण्यात ठेवणे धोकादायक आहे. त्यामुळे पोलिसांनी फटाके जप्तीपेक्षा थेट दुकानमालकांना समज देऊन फटाक्यांसह दुकानच काढून टाकण्याचे आदेश दिले आहे. पोलीस ठाण्यात जप्त केलेले फटाके ठेवल्यास गंभीर दुर्घटना घडू शकते.

# झाले गेले विसरून जाऊ', पुणे भाजपा अध्यक्षांनी केली बंडाची तलवार म्यान

पुणे : विधानसभा निवडणुकीच्या अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस पुणे भाजपासाठी दिलासा देणारा ठरला. वडगाव शेरी आणि कसबा या शहरातील दोन विधानसभा मतदारसंघात नाराज असलेल्या दोन बड्या भाजपा नेत्यांची समजूत काढण्यात पक्षाला यश आलं आहे. वडगाव शेरी मतदारसंघात माजी आमदार जगदीश मुळीक अर्ज भरण्यासाठी निघाले होते. त्यांनी शेवटच्या क्षणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फोन केल्यानं माघार घेतली. त्यापाठोपाठ पुणे शहराचे भाजपा अध्यक्ष धीरज घाटे यांनी 'झाले गेले विसरून जाऊ, नव्या दमाने महायुतीला निवडून देऊ..' म्हणत आपली बंडाची तलवार म्यान केली आहे.



पुणे शहरातील कसबा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास धीरज घाटे इच्छूक होते. पण, भाजपानं कसबामधून हेमंत रासने यांना उमेदवारी दिली. त्यामुळे घाटे यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली होती. त्याचबरोबर कार्यकर्त्यांशी बोलून पुढील निर्णय घेण्याचा इशारा दिला होता. घाटे काय निर्णय घेणार? याकडं सर्वांचं लक्ष लागलं होतं.

घाटे यांनी मंगळवारी हेमंत रासने यांनी अर्ज भरताना उपस्थित राहत आपण पुन्हा एकदा पक्षाच्या कामात सक्रीय झाल्याचं जाहीर केलं. त्यांनी सोशल मीडिया नेटवर्क द वर ट्विट करत पुण्यातील सर्व ८ उमेदवार विजयी करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं जाहीर केलं.